
# नीति-कथा

भाग ४



# नीति-कथा

**भाग ४**


लेखक

**एल्. जे. लारसन**



रजिस्टर्ड

९६३५८

ला. ला.

सर्व अधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन



ओरिएन्टल वॉचमन पब्लिशिंग हाऊस,

सॅलिसबरी पार्क, पोस्ट बॉक्स ३५,

पुणें १, भारत

# प्रस्तावना

नीतिपूर्ण आणि व्यावहारिक जीवनाशीं सुसंबद्ध अशा गोष्टींची स्वस्त पुस्तकें छापण्यांत यावी असा आमच्या वाचकांचा आग्रह होता. त्यानुसार अशा पुस्तकांच्या मालेंतील पहिलें तीन भाग प्रकाशित करण्यांत आलें आहेत. आता याच मालेंतील चवथा भाग आम्हीं वाचकांना सादर करीत आहोत.

हा चतुर्थ भाग या आशेने प्रकाशित करण्यात येत आहे कीं दक्षिण आशियांतील वाचकांची असल्या प्रकारच्या वाङमयाची गरज भरून काढण्यांत यावी.

— प्रकाशक

# अनुक्रमणिका


पृष्ठ क्रमांक

आईचा वाढदिवस . . . . . . . . . . . . . . . . . . . ७
बऱ्याची फेड–? . . . . . . . . . . . . . . . . . . . १३
क्षणभंगुर संसार . . . . . . . . . . . . . . . . . . . १७
माऊफ्लाऊ . . . . . . . . . . . . . . . . . . . १९
प्रभू येशूने शिकविलेली प्रार्थना . . . . . . . . . . . . . . . . . . . २५
कवडीचुंबकराव . . . . . . . . . . . . . . . . . . . २७
विलक्षण नाव . . . . . . . . . . . . . . . . . . . ३१
सूर्य आणि पाऊस . . . . . . . . . . . . . . . . . . . ३३
सर्वोत्तम शिफारस . . . . . . . . . . . . . . . . . . . ३७
कॅप्टन दंताळेंची पलटण . . . . . . . . . . . . . . . . . . . ४१
"लवकर निजे, लवकर उठे, तया–" . . . . . . . . . . . . . . . . . . . ४५
आज्ञाभंगाचा परिणाम . . . . . . . . . . . . . . . . . . . ४९
नशीब कीं प्रयत्न ? . . . . . . . . . . . . . . . . . . . ५३
आपुलकीचे प्रतिफळ . . . . . . . . . . . . . . . . . . . ५५
'आळशी' हाड . . . . . . . . . . . . . . . . . . . ५९
मालतीची नव्या वर्षाची रोजनिशी . . . . . . . . . . . . . . . . . . . ६२
बढाईखोर दिनू . . . . . . . . . . . . . . . . . . . ६५
उर्मिलेचा पाठ . . . . . . . . . . . . . . . . . . . ६७
समाप्तिची प्रार्थना . . . . . . . . . . . . . . . . . . . ७१



आईच्या वाढदिवशीं लीलेने सर्व घरकाम केलें व आईला सम्पूर्ण विश्रांति दिली.

वाचनालय ...
क्र. ९६४५८ नों.
दि. बा. बा

# आईचा वाढदिवस

लीलेने त्रासलेल्या मुद्रेने रामकडे पाहिलें. "तुला माहित आहे ना कीं पुढल्या आठवड्यांत आईचा वाढदिवस आहे म्हणून. आपण तिच्यासाठी काय करावें कळत नाहीं. माझ्याकडे कांहींच पैसे नाहींत. तुझ्याजवळ आहेत?" तिने विचारलें.

"माझ्याजवळ नाहींत हें तुला ठाऊक आहे," रामने आपलें काम थांबवून तिच्याकडे पाहात उत्तर दिलें. "बाबा आजारी असल्यामुळें आपल्याला पैसे मिळणार नाहींत. आईला पैशांची इतकी अडचण आहे कीं तिच्याकडे पैसे मागायचें धैर्यच होत नाहीं मला!"

लीला थोडा वेळ विचारांत पडली. नंतर ती म्हणाली, "आईला आनंद होईल असें कांहींतरी तिच्या वाढदिवसानिमित्त करायला हवें. पैशांशिवाय करता येण्यासारखें कांहींतरी असेलच कीं! काल रात्रीं रमाआत्या आईबरोबर बोलत असतांना म्हणत होत्या कीं पैसे म्हणजेच सर्व कांहीं नव्हे. पैशांशिवायहि त्यांना बरीच सुखें लाभली आहेत. आणि पुष्कळसें पैसे खर्चूनहि अनेकदां त्यांना निराश व्हावें लागले आहे. त्या म्हणत होत्या कीं खरा आनंद पैशांनी विकत घेता येत नाहीं. त्यांच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य असेलच. आपल्याकडे पैसे नाहींत तरी आईला आनंद मिळावा असे आपण कांही करूं शकूं असें तुला नाहीं कां वाटत?"

"पैशांशिवाय जगांत काय करता येतें? साधा रुमाल बनवायचा तरी त्याला कापड लागतें कीं नाहीं? कोण आपल्याला वस्तु फुकट देणार आहेत तूंच सांग," राम निराशेनें म्हणाला.

"आईला घरकामात मदत करायला कुणी बाई असती तर बरें झाले असतें. मला आईला मदत कराविशीं वाटतें पण ती करूं देत नाहीं. ती म्हणते मी अजून लहान आहे. बाबांना अर्धाच पगार मिळतो, आणि त्यांच्या औषधांसाठी आणि पथ्यासाठींच खूप खर्च होतो. बिचाऱ्या आईला सारेंच बघावें लागते."

"तूं पुन्हां पैशांबद्दल बोलायला लागलीस. पैशांशिवाय आपल्याला काय करता येईल हें तूं सांगणार होतीस ना?" राम म्हणाला.

"बघ, मला एक विचार सुचला आहे," लीला म्हणाली.

"सांग तरी, काय तो!" आपले कुतूहल दिसूं न देता राम म्हणाला.

आईला मदतीला बाई ठेवायला आपल्याकडे पैसे नाहींत, पण आपल्याला तिची मदत नाहीं कां करता येणार? तिच्या वाढदिवशीं आपण तिला संपूर्ण विश्रांति देऊं या. आपण तिचे संपूर्ण काम करूं या. मला माहित आहे कीं तसें करायला आत्तांपासूनच रोज ती काय काय करतें तें नीट पाहून ठेवलें पाहिजें. मग तिच्या वाढदिवशीं आपल्याला तें सर्व करायला जमेल असे मला वाटतें. तुला काय वाटतें?"

"तूं म्हणतेस तसें करतां येण्यासारखें आहे खरें!" राम उत्साहानें म्हणाला.

पुढील दोन तीन दिवस सर्व बेत आखले जात होते. शेजारच्या रमआत्यांचीहि मदत घेण्यांत आली होती. त्यांच्याकडून आवश्यक तें मार्गदर्शन झालें होते.

शेवटीं आईच्या वाढदिवसाचा दिवस उगवला. आई सकाळी झोपेंतून उठली ती दचकूनच! खिडकीतून ऊन आंत आलें होते. उशीर झाला तर! घड्याळ कां वाजलें नाहीं? तिने टेबलाकडे पाहिलें. घड्याळ तिथें नव्हतेंच. तिने आपल्या मनगटी घड्याळांत पाहिलें. बापरे! साडेसात वाजलें होतें. आतां काम कधीं उरकायचें? आणि यांचें (मुलांच्या वडिलांचे) कसे काय? तोच दरवाजा हळूंच उघडला गेला आणि लीला एक ताट घेऊन आंत आली. त्यांत छानसा नाश्ता (भोजन) होता. "आई तुझा वाढदिवस सुखाचा जावो," ती हसून म्हणाली. "आम्हीं तुला आज आराम द्यायचें ठरविलें आहे म्हणून मी इथेंच तुझ्यासाठी न्याहारी घेऊन आले बघ"

"ते सारे ठीक. पण मला अगोदर तुझ्या वडिलांचें बघायला नको कां? त्यांची आंघोळ, त्यांची न्याहारी. नाहींतर त्यांना आराम वाटायचा नाहीं," आई म्हणाली.

"त्यांचे सर्व झालें आहे. त्यांची आंघोळ झाली, त्यांची न्याहारीपण झाली. ते आतां परत झोपलें आहेत. मी तुझी न्याहारी मांडते, तोवर तूं तोंड धुवून घे," लीला म्हणाली.

आई तोंड धुवून उशी घेऊन बिछान्यावर आरामशीर टेकून बसली. लीलाने न्याहारी मांडून ठेवली होती. फुलांचा एक गुच्छदेखील तिने आणला होता.

"हें सारें तूंच केलेस कां?" आईने कौतुकाने विचारलें.

"रमाआत्यांनी कांहीं सूचना दिल्या. चटणी रामने बनविली. बाकी सारें मी केलें. पण तूं पुढें काय घडतें तें पाहशीलच म्हणा!" एवढें म्हणून ती घाई-घाईने निघून गेली. जणुं तिचें गुपित तिच्या हृदयांत मावत नव्हतें!

आईने सावकाश, मजेंत, आरामांत न्याहारी उरकली. आज प्रत्येक घास तिला मधुर लागत होता. ह्यांचें सारे कांहीं झाले असून, ते निवांत झोपले आहेत हें ऐकून ती कांहीशीं निर्धास्त झाली होती.

तिने ताट टेबलावर सरकविलें अन् त्याच वेळी दार उघडून रमाबाई आंत आल्या-बाहेर जायच्या पोषाखांत. "रमाबाई, इतक्या सकाळीं तुम्हीं कुठें बाहेर जाणार आहांत कां?" तिने आश्चर्यानेच विचारलें.

"होय–आणि तुम्हांलासुद्धां माझ्याबरोबर यायचे आहे. आज तुमचा वाढदिवस आहे ना? म्हणून आपण गुप्तेबाईंच्या मळ्यांत जाणार आहोत," रमाबाई म्हणाल्या.

"पण रमाबाई, तें मला शक्य नाहीं हें तुम्हांला ठाऊक आहे. मला तो भाग आवडतो. पण मुलांना आणि ह्यांना सोडून मी कशीं येणार? माझ्याशिवाय त्यांचे कसें होणार ?"

"त्याची काळजी तुम्हीं करूं नका. आज सर्व व्यवस्था चोख होणार आहे. लवकर तयार व्हा. आज आपल्याला बरेंच दूर जायचे आहे. शिवाय जेवण्याच्या वेळीं तिथें हजर असायला हवें!" रमाबाई लीलाच्या आईला समजावीत म्हणाल्या.

आई तयार झाली आणि शेजारच्या खोलीजवळ जाऊन हळूंच दार लोटून तिने आंत डोकावलें. मुलांचे वडील शांत झोपलें होते आणि सारी खोली अगदीं व्यवस्थित होती. मुलांचा निरोप घेऊन व त्यांना वडिलांची नीट काळजी घेण्यास सांगून आई निर्धास्त मनानें रमाबाईबरोबर निघाली. मुलांनी आपलें काम चोख बजाविलें होते.

बसचा प्रवास आल्हादकारक होता बसमध्यें आई खिडकीनजीक बसली होती व सकाळची शीतल हवा तिला फार सुखद वाटत होती. तिच्या चेहऱ्यावर आनंद होता. त्या दोघी जेव्हां मैत्रिणीकडे पोहोंचल्या तेव्हां जेवणाची वेळ झाली होती. गुप्तेबाईंनी जेवणाची व्यवस्था लिंबाच्या गर्द छायेंत केली होती. जेवण झाले. जेवणानंतर आरामखुर्चीत बसून मनमोकळेपणें खूप गप्पा झाल्या. शेवटीं रमाबाईच म्हणाल्या, "चला, आता निघायला हवें!"

"अरे?" आई म्हणाली, "गप्पांच्या भरांत मी सगळे कांहीं विसरून गेले. चला. घरीं लवकर गेलेच पाहिजे. घरची काय व्यवस्था झाली असेल कुणास ठाऊक! उद्यां सगळें साफसूफ करावें लागणार मला, पण आज मात्र वेळ फार मजेंत गेला."

"घरची काळजी नको!" रमाबाई म्हणाल्या. "घर तुम्हांला कल्पना नाहीं इतकें स्वच्छ नि नीटनेटकें असणार!" ....

"अरे वा ऽऽऽ" समोरचा दरवाजा लोटून घरांत येता येता आई म्हणाली. "वास बाकी छान येतो हं! कांहींतरी चांगले शिजतेय घरांत!"

जेवणाच्या खोलींत चार खुर्च्या मांडल्या होत्या. घरांतल्या ठेवणीतल्या बश्या आणि चांदीची भांडी टेबलावर होती. टेबलावरची रचना पाहून आई खूप

झाली. मध्यभागीं मोठा वाढदिवसाचा केक ठेवला होता. त्यावरची नक्षी आणि अक्षरें थोडी वेडीवाकडी होती, पण आईच्या नजरेला सारेच सुंदर दिसत होते. खोली फुलांनी सजविलेली होती. आईच्या आवडत्या गुलाबांचा एक गुच्छ तिच्यासाठीं आणून ठेवलेला होता. लीलेने जेवण वाढलें. सारेजण खुषींत होते. केक थोडा जळाला होता आणि बटाटे जरा कच्चे होते. पण कुणाला त्याचें कांहीं वाटलें नाही.

त्या रात्रीं जेव्हां आईनें बायबल बंद करून दिवा मालविला तेव्हां तिच्या डोळ्यांत अश्रु होते. तिच्या वाढदिवशीं तिला सुख मिळावें म्हणून मुलांनी दिवसभर किती खटपट केली होती. " आपल्याला अशी सद्‌गुणी मुलें देवाने दिली ही देवाची किती दया आहे!" आई तिच्या 'ह्यांना' म्हणाली.



# बऱ्याची फेड

"मी माझी नवीं हत्यारे कुणाला देणार नाही, नि आतां कुणाची हत्यारें मागण्याची मला गरज पडणार नाहीं," दिलीप उद्गारला.

तो दिलीपचा तेरावा वाढदिवस होता आणि त्याच्या काकांनी त्याला एक सुंदरशी हत्यारांची पेटी भेंट म्हणून दिली होती–

"माझी ही हत्यारें कुणी नेऊं नये म्हणून मी ह्या पेटीला नेहमीं कुलुप लावीन आणि त्याची किल्ली माझ्या खिशातच ठेवीन !" हें बोलता बोलताच त्याने पेटीला कुलूप लावलें.

"पण एक विसरू नकोस कीं आतापर्यंत तूं अनिलची हत्यारें वर्षभर वाटेल तशी वापरीत होतास, आणि आतां तुझी तूं त्याला वापरूं द्यावीस हेंच योग्य आहे," वडिलांनी त्याला हटकलें.

दिलीपने त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें. अनिल त्याचा मित्रच होता परंतु आपली मौल्यवान हत्यारें दुसऱ्याने वापरावीत ही कल्पनासुद्धां त्याला सहन होईना आणि त्याला आठवलें कीं अनिलने तो बनवीत असलेल्या खेळण्याविषयीं त्याला सांगितलें होते. अनिल त्याच्या छोट्या बहिणीकरितां एक खेळणे बनवीत होता. त्याला लहान छिद्रें पाडण्याची आवश्यकता होती. परतु अनिलचे नेमकें तेंच हत्यार त्याला सांपडत नव्हतें. दिलीपला तसलेंच एक भेंट म्हणून मिळाले होते. अनिलला तें कळले तर तो बिनदिक्कत तें हत्यार घेऊन जाईल–दिलीप घरीं नसला तर त्याला न विचारतासुध्दां!

"मी पेटीला कुलुप लावलें हेंच बरें केलें," किल्ली ठेवलेल्या खिशावर हात ठेवीत तो म्हणाला.

त्याच दिवशीं दुपारीं अनिल त्याच्या हत्यारांची पेटी न्याहाळून पाहतांना त्याला आढळला.

"ही फारच छान भेट आहे हं, दिलीप," तो उत्साहाने म्हणाला. "ही पेटी जर माझी असती तर मी कुणाला हात लावूं दिला नसता तिला."

"माझ्याही मनांत तेंच आहे," दिलीप म्हणाला.

"तुझ्याजवळ किल्ली असेलच, नाहीं कां?" अनिलने विचारलं.

"आहे तर." आणि त्यानें किल्ली अनिलला बघायला दिली.

"चांगलीच बळकट दिसते. अर्थात त्यामुळें तुझी हत्यारें अधिक सुरक्षित राहतील म्हणा!" अनिल म्हणत होता, तोच त्यांच्या कानावर अनिलच्या वडिलांचा आवाज पडला.

"चल बाळ, आतां आपल्याला बाजारांत जायचें आहे," ते म्हणाले.

अनिल तीरासारखा दाराकडे पळाला.

"दिलीप, हवें असेल तर तूंसुद्धां चल," त्यानें दिलीपला म्हटलें.

"नको. मला आईचे एक काम करायचें आहे. खरें तर मी मघाशींच तें करायला हवें होते."

आईचें काम संपवून आणि इतर लहानसहान कामें पार पाडीपर्यंत दिलीपला बराच वेळ झाला होता. आपल्या हत्यारांजवळ तो येऊं शकला नव्हता. पण हरकत नाहीं. हत्यारे तर कुलुपांत बंद आहेत. त्याचा हात खिशाकडे गेला. आणि तो थबकला.

"बापरे ! अनिलच्या वडिलांनी त्याला बोलाविलें तेव्हां किल्ली त्याच्याकडेच होती. त्याने परत केली कीं नाहीं? छे, नक्कीच नाहीं!" त्याच्या अंगावर शहारें आलें.

"हलकट कुठला!" तो पुटपुटला. "पण मी त्याला धडा शिकविणार आहे. मी किल्लीबद्दल त्याला विचारणारसुद्धां नाहीं आणि तो कधी कांही मागायला आला तर म्हणेन माझी किल्लीच हरवली बघ; आता पेटी उघडता येत नाही. मी मात्र नवी किल्ली बनवून घेईन."

शाळेंत जातांना त्याला नेहमीच्या ठिकाणीच अनिल त्याची वाट पहात बसलेला दिसला. आपलें त्याच्याकडे लक्षच नाहीं असें दाखवीत दिलीप पुढें चालूं लागला पण त्यानें त्याला गाठलें व तो त्याच्यासोबत चालूं लागला. अनिलने नव्या पेटीची गोष्टही काढली नाहीं. पण शाळेंत मधल्या सुट्टींत मात्र त्याने सर्व मुलांना दिलीपच्या नव्या पेटीबद्दल सांगितलें. दिलीप मात्र आपलें ओठ चावत गप्प होता.

दिवस कसावसा गेला. दिलीपने अनिलकडे दिवसभरांत एकदांही पाहिलें नाहीं. आणि शाळा सुटताच तो त्याच्यासाठी न थांबता तडक घरीं निघाला.

घराच्या फाटकाशींच त्याला त्याचे वडील भेटलें. "वरें झाले तूं आलास. अगदी वेळेवर आलास. दुकानांत जाऊन जरा खिळे घेऊन ये पाहूं."

दिलीप पैसे घेऊन घाईघाईने परत फिरला. वाटेंतच त्याला अनिल भेटला. तो त्याच्याशीं बोलणारसुद्धां नव्हता. पण मग विचार बदलून तो म्हणाला, "मी दुकानांत खिळे आणायला जातोय. तूं चलतोस कां सोबत?"

"चल", अनिल म्हणाला.

दोघेही सोबत चालूं लागलें. दिलीपच्या मनांत अनिलला किल्ली-विषयी विचारावें असें आलें. पण आपला निश्चय आठवून तो गप्प राहिला. खिळे विकत घेतलें. परततांना अनिलचें लक्ष जवळच्या एका इमारतीच्या जाळीकडे गेलें.

" दिलीप, ही जाळी बघ जरा!" अनिल त्या इमारतीशी उभा राहून पाहत म्हणाला. "याची बांधणी किती कुजकी दिसते. आपण सांगितलें पाहिजे हें मालकाला."

"मला तें काल दुपारीच कळलें," दिलीपने तुटकपणें उत्तर दिलें, आणि तोही त्या जाळीजवळ गेला.

तेवढ्यांत अचानक त्याचा पाय घसरला आणि त्याच्या हातांतले खिळे चहूंबाजूंला विखुरले. आतां? आतां काय करणार? निम्में खिळे तर जाळी-पलीकडे पडलें.

अनिलचा चेहरा उजळला. त्याने विचारलें, "दोरी आहे कां ?"

"हो, दोरी आहे. पण नुसत्या दोरीचा काय उपयोग?" दिलीप म्हणाला.

"नुसत्या दोरीचा नाहीं. एकदां याकडेहि बघ," अनिलने म्हणत खिशातून एक वस्तु काढली.

"लोहचुंबक ?" दिलीप उद्गारला. "कुठून आणलास तूं ?"

अनिल हंसत म्हणाला, "मी नुकताच विकत घेतला. तुझ्या हत्याराच्या पेटींत याची उणीव होती ना, म्हणून. त्यांत लोहचुंबक नाही हें काल तू पेटी उघडून दाखविलीस तेव्हांच मी पाहिलें."

दिलीपला म्हणावेसें वाटलें, "मला ठाऊक आहे, तूं मला चिडवूं पाहतोस कारण तूं माझी किल्ली चोरली आहेस." तो कांहींच बोलला नाहीं.

"चल," दोरीला चुंबक बांधून अनिल म्हणाला आणि त्याने जाळींतून चुंबक आंत सोडला. "आपण आता सारे खिळे शोधून काढूं."

कांही मिनिटांतच सारे खिळे गोळा झाले. मग अनिलनें शेवटचा प्रयत्न म्हणून परत चुंबक आंत फिरवला. आणि काय आश्चर्य–दिलीपचा चेहरा एकदम पडला कारण चुंबकाला नवी, चकाकणारी किल्ली चिकटली होती.

"अरे!" अनिल उद्गारला. "तुझ्या नव्या पेटीच्या किल्लीसारखीच दिसते, नाहीं?"

"हो . . ती,ती माझीच किल्ली आहे!" अनिलच्या नजरेला नजर न भिडवता दिलीप म्हणाला. त्याला एकदम आठवलें कीं काल आईच्या कामासाठीं जातांना आपण त्या जाळीजवळ थांबलो होतो आणि कांहींतरी पडल्याचा 'खणकन्' आवाजहि आपण ऐकला होता. पण त्याकडे फारसें लक्ष दिलें नव्हतें. त्यावेळीं आपल्या खिशांतून आपली किल्ली खाली पडली असली पाहिजे. "तुझ्याकडे चुंबक होता हें 'लकी'च झाले नाहीं का, अनिल?" तो म्हणाला.

'तसें घडलें खरें !' अनिल म्हणाला. "पण तुला नवी पेटी मिळाली नसती तर मीसुद्धा हा विकत घेतला नसता. कारण मी हा खास तुझ्यासाठीं आणलाय."

"तूं फार दिलदार मुलगा आहेस," दिलीप कृतज्ञतेनें म्हणाला. "आणि हे बघ, तुला कधीं माझ्या हत्याराची गरज पडली तर तूं तीं बेलाशक घेऊन जा. माझ्या पेटीला आतां कुलूप असणार नाहीं."

—————0—————

# क्षणभंगुर संसार

कां भुललासी या संसारा? व्यर्थ, नरा, हा सर्व पसारा ।
या जगतीं बा नित्य न कांहीं, सर्व क्षणिक हें, जणुं जलधारा ।
धन सम्पत्ति, कीर्ति जगाची, दो दिवसांची क्षणभंगूरा ।
दो दिवसांचे आयु तुझें हें, कंठिसी कैसे, कर विचारा ।
परलोकीं तुज कोण प्रभूविण, कोण प्रभूविण देईल थारा ? ।

—स. आ. पाठक



# माऊफ्लाऊ

लोलो आणि मांऊफ्लाऊ इथून दूर असलेल्या इटली नांवाच्या देशात राहतात.

लोलो कांहीं तुमच्यासारखा सशक्त नाहीं. त्याला तुमच्यासारखें पळता किंवा खेळतासुद्धां येत नाहीं. कारण तो पांगळा आहे. कुबडीच्या आधाराने तो लंगडत चालतो. तो कधींच शाळेला जाऊ शकला नाहीं. पण त्याच्या कुशल बोटांनी मात्र तो वेताच्या चटया किंवा टोपल्या विणत बसतो. माऊफ्लाऊ त्याचा जिवलग मित्र आहे. ते नेहमीं घरीं एकत्रच असतात.

माऊफ्लाऊ हा त्याचा पांढराशुभ्र केसाळ कुत्रा. त्याचे केस मेंढराच्या लोकरीप्रमाणें मऊ आहेत. म्हणून त्याला माऊफ्लाऊ असें नांव पडलें. 'माऊफ्लाऊ' म्हणजे त्यांच्या देशांतील मेंढी.

लोलोचे वडील चार वर्षांपूर्वीच मरण पावले होते. त्यामुळ आपल्या मुलाच्या पालनपोषणासाठीं लोलोच्या आईला खूप कष्ट करावें लागत असत. त्याला टासो नावाचा मोठा भाऊहि होता. तो एका माळ्याकडे काम करीत असे आणि शनिवारीं रात्री आपली मजुरी घेऊन येत असे. टासोला आता मिशा येऊं लागल्या होत्या. त्याकाळीं सर्व पुरुषांना सैन्यांत भरती व्हावें लागत असे. म्हणून आपल्या टासोला लवकरच दूर जावें लागणार या विचाराने लोलोची आई नेहमी चिंतेंत असे.

तुमच्याजवळ पैसे असलें तर आपल्याऐवजी तुम्हीं दुसऱ्या कुणाला सैन्यात पाठवूं शकत होता. पण टासोजवळ तर पैसे नव्हतें. आणि त्याची आईहि गरीब होती. त्यामुळें दोघेंही नेहमींच काळजींत असत.

एके दिवशीं सकाळीं लोलो आणि माऊफ्लाऊ चर्चच्या पायऱ्यांवर बसून जाणाऱ्यायेणारांची गंमत पाहत होते. तोच जवळून जाणाऱ्या एका गृहस्थाची नजर माऊफ्लाऊवर पडली.

"फार छान कुत्रा आहे," ते म्हणालें.

"होय, पण तुम्हीं त्याला रविवारीं आंघोळ घातल्यानंतर पाहायला हवें तेव्हां अगदी शुभ्र दिसतो!" लोलो म्हणाला.

"त्याला कसल्या करामती येतात कां?" त्याने विचारलें.

"बऱ्याच येतात," लोलो म्हणाला. त्यानेच माऊफ्लाऊला करामती शिकविल्या होत्या. "तो मागच्या पायावर उभा राहतो; तो नाचतो, बोलतो आणि कोलांटयासुद्धां मारतो. जेव्हां मी उंच हात करून त्याला बिस्कीट दाखवितो तेव्हा तो उडी मारून तें घेतो."

त्या गृहस्थांनी कांही खेळ पाहण्याची इच्छा व्यक्त केली. माऊफ्लाऊलाहि अतिशय आनंद झाला कारण त्याला कुणी कधीं मारलें वा दुखवलें नव्हतें. त्यामुळें तो आपल्या लहानशा मालकाला हवें तें करायला नेहमींच तयार असे. त्याने इतक्या उत्कृष्ट करामती करून दाखविल्या की ते गृहस्थ त्याच्यावर बेहद्द खूष झाले. नंतर ते म्हणालें की त्याच्या घरीं एक मुलगा आहे. तो इतका अशक्त आणि आजारी आहे कीं त्याला उठतासुद्धां येत नाहीं. लोलोने आपला कुत्रा त्याला दुसऱ्या दिवशीं दाखवावा अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी लोलोला कांहीं पैसे दिलें आणि आपला पत्ता सांगितला.

लोलो लंगडत घाईघाईने घरी गेला आणि आईला म्हणाला, "आई, बघ एका गृहस्थाने मला पैसे दिले. आपल्या माऊफ्लाऊच्या करामती त्याना फार आवडल्या." मग त्याने त्या गृहस्थांबद्दल आईला सारें सांगितलें. दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे जायचे आहे, हेंहि सांगितलें.

दुसऱ्या दिवशी माऊफ्लाऊला स्वच्छ आंघोळ घालण्यांत आली. त्याच्या गळयांत निळी रिबिन बांधण्यांत आली. आणि ते दोघे निघाले. त्यांना त्या मुलाची खोली दाखविण्यांत आली. तिथें आरामखुर्चीवर तो अशक्त, दु:खी मुलगा बसला होता. त्यांना पाहून तो आनंदीत झालेला दिसला. माऊफ्लाऊच्या करामती पाहून तर तो टाळया वाजवूं लागला.

लोलो परत जाण्यास निघाला तेव्हां तो मुलगा रडूं लागला. "मला तो कुत्रा हवाय. तो कुत्रा राहू दे माझ्यासाठीं !"

"तें शक्यच नाहीं. तो माझा कुत्रा आहे. मी तो तुला देणार नाही," लोलो म्हणाला.

त्यावर तो मुलगा मोठ्याने रडूं लागला. यावेळी त्या गृहस्थांनी त्याला अधिक पैसे दिले. त्या आनदातच मनांत मनोरे रचत तो घरीं आला, पण त्याच्या आनंदावर विरजण पडलें कारण त्याला घरीं आई रडत बसलेली आढळली. टासोहि घरींच होता. सारे दु:खी दिसत होते.

"काय, झालें तरी काय?" लोलोने विचारलें. पण कुणीच उत्तर दिलें नाहीं. माऊफ्लाऊसुद्धां त्यांचे दु:ख पाहून हेल काढून विव्हळूं लागला. मग कुणीतरी सांगितलें की टासोला सैन्यांत बोलावणें आले होते. आपल्या मुलाचे कसें होईल या विचाराने आई दु:खी होती.

दुसऱ्या दिवशी लोलो आणि माऊफ्लाऊ टासोबरोबर त्याच्या बागेंत गेले. टासो गेल्यानंतर त्या बागेचे काय होणार यावर त्यांचे बरेच बोलणें झालें. शेवटी टासो म्हणाला कीं कांहीं पैसे जर मिळाले असतें तर त्याला जावें लागले नसते. पण कोण तेवढे पैसे देणार ? दुपारी लोलो आणि माऊफ्लाऊ जेवायला घरीं गेले. जेवण झाल्यावर आई म्हणाली कीं लोलोला आज त्याच्या मावशीकडे जायचे आहे. मावशी बाजाराला जाणार होती आणि तिच्या गैरहजेरीत त्याला तिच्या मुलाला सांभाळायचे होते. लोलोने लगेच आपली टोपी चढवली आणि माऊफ्लाऊला हांक मारली.

"नको. कुत्र्याला नेऊं नकोस. मावशीला तो आवडत नाहीं," आई म्हणाली.

"कां नको ? — मी त्याला सोडून जाणार नाहीं. तो माझा कुत्रा आहे." लोलो म्हणाला.

"मी सांगितले तें ऐक. मला पुन्हां सांगायला लावूं नकोस. त्याला घरींच राहूं दे!" आई म्हणाली.

नाईलाजाने लोलो वळला आणि पायऱ्या उतरून चालूं लागला. रात्रीं तो घाईघाईने घरी परतला. खालच्या पायरीशीं उभे राहूनच त्याने हांक मारली: "माऊफ्लाऊ!" पण माऊफ्लाऊला त्याची हांक ऐकूं आली नाहीं. तो पायऱ्या चढून वर गेला. आणि त्याने पुन्हां हांक मारली. पण ते इवलाले शुभ्र पंजे पायऱ्या उतरतांना दिसलें नाहींत. तो झपाट्याने वर गेला आणि दार लोटून म्हणाला, "माझा माऊफ्लाऊ कुठें आहे? तुम्हीं त्याचे काय केले ?"

"त्याला विकलें," शेवटीं आईच बोलली. "ज्याला तूं त्याच्या करामती दाखविल्या होत्या त्या गृहस्थाला. आज तो इथे आला होता. त्याला कुत्रा फारच आवडला होता. त्यासाठीं त्याने खूप पैसे दिलेत. इतके पैसे दिलेत कीं आपण टासोऐवजी दुसऱ्या कुणाला लढाईवर पाठवूं शकूं."

पण तिचे बोलणें संपण्यापूर्वीच तो दु:खाने काळवंडला. त्याचे हात पाय थरथरूं लागले. "माझा माऊफ्लाऊ, माझा माऊफ्लाऊ विकला" असें म्हणून त्याने दोन्ही हात तोंडावर झाकून घेतले आणि तोल जावून तो जमिनीवर धाडकन कोसळला. तो बेशुद्ध झाला.

आईने उचलून त्याला खाटेवर ठेवलें. रात्रभर तो तडफडत होता. कुत्र्याला हांका मारीत होता. सकाळ झाली तरी त्याचा ताप हटला नव्हता.

दिवसांमागून दिवस गेले. लोलो अजून बिछान्यांतच होता. त्याचा आजार वाढत होता. तो आपल्या भाऊबहिणींना, आईला, कुणालाच ओळखत नव्हता. तो सारखा तडफडत होता. टासोने जाऊन माऊफ्लाऊसाठीं त्या गृहस्थाला शोधण्याचा प्रयत्नहि केला होता. परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं. शेवटीं लोलोचा आजार इतका वाढला कीं त्याला लवकरच मृत्यु येईल असें डॉक्टर सांगू लागले.

एके दिवशीं दुपारी सारेजण खोलींत बसले होते. खिडक्या उघडयाच होत्या. आई लोलोच्या उशाशीं बसली होती. आणि टासोदेखील घरीं राहून आपल्या भावाची सेवा करीत होता. सारे कांहीं इतके शांत होते कीं लोलोचा श्वाच्छोश्वासदेखील ऐकूं येत होता. तोच एकाएकी पायऱ्यांवर पावलांची चाहूल लागली. आणि लगेच एक पांढरा कुत्रा चटकन् खाटेवर चढला. तो माऊफ्लाऊ होता. पण त्याला ओळखतासुद्धा येत नव्हतें. तो इतका अशक्त झाला होता की त्याची सारी हाडें मोजता आली असती. त्याचे केस अस्ताव्यस्त झाले होते. त्याचे पाय धुळीने आणि रक्ताने माखले होते. तो बऱ्याच मैलांचे अंतर चालून आल्याचे स्पष्टच दिसत होते. त्याच्या स्पर्शाने लोलोने डोळे उघडून पाहिलें. माऊफ्लाऊला पाहून त्याने आपला हात त्याच्या डोक्यावरून फिरविला आणि मग कुशीवर वळून शांतपणें तो झोपीं गेला. माऊफ्लाऊ बिछान्यावरून खालीं उतरलाच नाहीं. डॉक्टर आले तेव्हां त्यांनी लोलोची प्रकृती जरा सुधारल्याचे सांगितलें. आता लोलो जगण्याची शक्यता निर्माण झाली होती.

लोलोची प्रकृति खरेंच सुधारूं लागली. एके दिवशीं तो गृहस्थ माऊफ्लाऊ तिथ आहे कां हे पाहायला आला. ते त्याला घेऊन जात असतांना तो मधूनच पळून आला होता नि त्यांना कुठेंच सांपडला नव्हता. टासो त्या गृहस्थांबरोबर पुन्हां हॉटेलवर गेला. तेथे त्यांना त्याने सारी हकीकत सांगितली. लोलो त्या कुत्र्याविना कसा मृत्युपंथाला लागला, आणि तो परत आल्यानंतर त्याची प्रकृति कशी सुधारूं लागली हेंही त्याने सांगितलें. त्याने त्यांना पैसे परत घेण्याची विनंती केली. हवें तर तो सैन्यांत जायलाही तयार होता. पण माऊफ्लाऊ नि लोलोची ताटातूट व्हावी असे त्याला वाटत नव्हतें.

कधीं कधीं लोलो प्रेमाने आपला हात माऊफ्लाऊच्या गळयांत टाकून त्याला विचारी, "काय रे, तूं परत कसा आलास माझ्याकडे ? नद्या, पर्वत, पूल वगैरे कसें ओलांडलेस तूं ?" पण माऊफ्लाऊ काय उत्तर देणार ? त्याने आपला मार्ग स्वतःच शोधून काढला होता. कारण त्याचे आपल्या लहानशा मालकावर जीवापाड प्रेम होते. म्हणूनच लोक नेहमीं म्हणतातच कीं, "प्रेमाला आपला मार्ग शोधून काढता येतो."



''हे आमच्या स्वर्गातील बापा, तुझें नाम पवित्र मानिलें जावो. तुझें राज्य येवो.
जसें स्वर्गात तसें पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणें होवो . . . .'

# प्रभू येशूने शिकविलेली प्रार्थना

अगा आमुच्या स्वर्गीय पित्या धन्य ।
प्रेमरूपा, प्रभुवरा, तूं अनन्य ।।

नाम मंगल तव वंद्य जगीं होवो ।
अमंगलता, अज्ञान अंत पावो ।।

प्रीतिनीतिचे राज्य तुझे येवो ।
दुरित सारे विलयास, विभो, जावो ।।

जसें स्वर्गीं, भूवरी तसें होवो ।
तुझी इच्छा सिद्धीस सदा जावो ।।

अन्न पाणी दे आज आम्हां, राया ।
जगन्नाथा, जगीं कार्य तव कराया ।।

आम्हीं अपराधी, दे क्षमा आम्हाला ।
क्षमा जेंवि देतसूं रे दुज्याला ।।

नको आणूं आम्हांस परिक्षेत ।
प्रभो, दुष्टापासून करी मुक्त ।।

राज्य, गौरव, सामर्थ्य सर्वदा हीं ।
तुझीं, बापा, वंदितो तुला पाहीं ।।

—स. आ. पाठक



# कवडीचुंबकराव

रविला खिडकीला दगड मारायचाच नव्हता. त्याने कावकाव करणाऱ्या एका कावळ्याला दगड मारला होता. पण तो कुठे पडेल हें मात्र पाहिले नव्हतें एवढेंच. दगड जोराने कवडीचुंबकरावांच्या खिडकीवर आपटला आणि मग रवि तेथून पळत सुटला तो थेट वडिलांच्या मागे मोटारीत बसला. तरी त्याला अधिकाअधिक उदास वाटूं लागले. दुसऱ्याचे नुकसान करणें योग्य नव्हतें. त्याला स्वत:चीच लाज वाटूं लागली. त्याच्या आईने त्याला निर्भयपणें वागायला शिकविलें नव्हतें कां ? तरी आज तो पळाला होता. भागुबाईसारखा.

त्याने असे पळून यायला नको होते. आता एकच गोष्ट करता येण्यासारखी होती. बिचारा रवि मोटारींतून खालीं उतरला आणि त्याच रस्त्याने परत फिरला. आता तो छाती काढून युद्धावर निघालेल्या सैनिकाप्रमाणे चालला होता. तो सरळ कवडीचुंबकरावांच्या दाराशी जाऊन उभा राहिला. त्याचे काळीज धडधडत होते. कवडीचुंबकराव हा एक दुष्ट आणि कंजूप मनुष्य असून तो नेहमीं एक काठी जवळ बाळगतो असे त्याला अनेकानी सांगितले होते.

रविने भीत भीतच दरवाजा ठोठावला आणि दाराच्या आंतल्या बाजूने पावलांचा आवाज आला. त्याने दरवाजा उघडण्यापूर्वी आपण पळून जावे असेंही त्याच्या मनांत येऊन गेले. पण तो तसाच, सैनिकासारखा ताठ उभा राहिला. हळूहळू दरवाजा उघडला गेला आणि एक म्हातारा दृष्टीस पडला. त्याचे डोळे निळे होते. पण तो दुष्ट असावा असे रविला वाटलें नाहीं. म्हातारा दयाळू दिसत होता. रविची भीती कमी झाली. उलट म्हाताऱ्याची त्याला दया आली.

"काय पाहिजे ?" म्हाताऱ्याने आपल्या थरथरत्या आवाजांत विचारलें.

"मी तुमची खिडकी फोडली," रवि म्हणाला.

"काय ?" तो म्हातारा कानामागे हात ठेवीत म्हणाला. "मला जरा कमी ऐकायला येते !"

"मी तुमची खिडकी फोडली," रवि मोठ्याने म्हणाला.

"खिडकी ?" म्हाताऱ्याला उलगडा होईना. रविने खिडकीकडे बोट दाखवून तेंच वाक्य पुन्हां म्हटलें. म्हातारा खिडकीजवळ गेला आणि काचेचे तुकडे पाहून म्हणाला, "ही काच कशी फुटली ?" जणूं तो स्वतःशीच बोलत होता.

रवि त्याच्या कानाशीं जाऊन म्हणाला, "मी फोडली."

"फोडलीस ?" तो पुटपुटला.

"मी नवीन आणून देईन," रवि म्हणाला.

"नवीन आणशील ? नको, नको ! त्याची काळजी करूं नकोस," म्हातारा म्हणाला. "आंत ये."

तो आंतल्या दरवाजाकडे वळला आणि त्याने रविला खूण करून मागें यायला सांगितलें. जीव मुठींत धरून रवि त्याच्या मागोमाग घरांत गेला. कवडीचुंबकरावाने कांहीं आंबे काढले आणि रविने तें सर्व घ्यावे म्हणून तो आग्रह करूं लागला.

" मला नाही वाटत तो म्हातारा दुष्ट असेल म्हणून, " रवि ही घटना घरीं आईला सांगतांना म्हणाला.

" नाहीं, बाळ. तो एकलकोंडा म्हातारा आहे. त्यामुळें त्याचा स्वभाव जरा तिरसट झाला असेल, पण तो दुष्ट खात्रीने नाहीं. तूं तुझ्या वडिलांसोबत जेव्हां नवी काच बसवायला जाशील ना, तेव्हां मी खमंग भजे करून देईन. तें त्या म्हाताऱ्या बाबाला घेऊन जा," त्याची आई म्हणाली.

आणि रविने तसेंच केले.



# विलक्षण नाव

एक जोसेफ नांवाचा मुलगा होता. त्याला आई नि वडिलांशिवाय कुणीही नव्हते. त्याचे वडील कोळी होते. आणि त्याचे घर समुद्राच्या अगदीं जवळ होते. त्यामुळें जेव्हां वडिल रात्रीं घरी परत येत तेव्हां ते आपली नाव सरळ अंगणापर्यंत वल्हवीत आणीत. एके दिवशीं जोसेफची आई कपडे धुवून वाळत घालीत होती. एका मोठ्या बादलीमध्यें सर्व कपडे तिने आणले होते. जोसेफ बाजूलाच खेळत होता. तिने सारे कपडे वाळत घातले आणि नंतर जोसेफला हांक मारली. पण उत्तर आले नाहीं. ती घाबरून इकडे तिकडे शोधूं लागली, पण जोसेफचा पत्ता नव्हता. तिने मग शेजारीपाजारी गोळा केलें. सर्वांनी तिला शोधण्यास मदत केली. पण जोसेफ सांपडला नाहीं. समुद्रावर भरतीच्या मोठमोठ्या लाटा उसळत होत्या. कांहीं कांहीं तर अगदीं मागल्या दारापर्यंत येत होत्या. जोसेफची आई दु:खी होऊन घरांत गेली आणि गुडघे टेकून आपल्या मुलासाठीं परमेश्वराची प्रार्थना करूं लागली.

दूर समुद्रावर जोसेफचे वडिल आणि इतर कोळी मासे पकडीत होते. त्यांना एकाएकीं दुरून कांहींतरी तरंगत येतांना दिसले. तें काय असावें हें त्यांना कळेना. प्रथम तो लाकडाचा मोठा तुकडा असावा असें वाटलें. पण तें जवळ येताच पिशवीसारखें दिसूं लागले आणि शेवटीं तो एक अरूंद तोंडाचा पिंप आहे हें दिसून आले. तो पाहून जोसेफचे वडिल म्हणालें, "कुणा तरी स्त्रीने आपला पिंप बाहेर अंगणांत ठेवला असावा, आणि भरतीमुळें तो इकडे आला असावा. पण त्यांत कपडे दिसताहेत कां?"

आणि मग काय झालें? तो पिंप जवळ, अगदीं जवळ आला. कोळ्यांनी तो नावेंत ओढून घेतला आणि वडिलांनी पाहिलें कीं त्यांत आपला स्वत:चा मुलगा आहे. शांत झोपलेला! त्याच वेळीं जोसेफही उठला आणि डोळे चोळीत इकडे तिकडे पाहूं लागला. इतके पाणी पाहून तो बावरून गेला. नंतर तो हंसू लागला, कारण आता तो वडिलांच्या कुशींत होता आणि ते त्याला कुरवाळीत होते.

"काय जोसेफ, बाळा, तूं इथंवर कसा आलास?"

"मला वाटते प्रभू येशूनेच मला इकडे आणलें," जोसेफ म्हणाला.

"तें तर खरेंच," वडिल म्हणाले. नंतर ते लवकरांत लवकर घरीं परतले. मुलगा सुरक्षित आहे हें आईला कळवायचे होते ना!

हें कसें घडले? जोसेफ रिकाम्या पिंपात खेळता खेळता झोपीं गेला होता. आणि भरतीच्या लाटेनें ती विलक्षण नाव अंगणाबाहेर पडून समुद्रावर तरंगू लागली होती. परंतु देवानेच, त्याच्या आईच्या प्रार्थनेला उत्तर म्हणून कीं काय, त्याला सुरक्षित ठेवून त्याच्या वडिलाकडे नेले.

—:—

# सूर्य आणि पाऊस

"आता तरी पाऊस थांबेल असे वाटते!" पुष्पा म्हणाली.

"मलाही तसेंच वाटते," मधुकरने री ओढली. "मला आज बाहेर कामें आहेत. पण पाऊस नेहमींच सगळें बिघडवितो. मला नाहीं तो आवडत,' त्याने तक्रार केली.

"कशाबद्दल बोलणें चालले आहे सारे?" मागून आवाज ऐकूं आला. "कोण म्हणालें कीं पावसाळा आवडत नाहीं?"

"मीच म्हणालो तसें, आत्या. आम्हांला नुसते घरांत बसून राहण्याचा कंटाळा आला बघ," मधुकरने आपली बाजू मांडली.

"छान, तुम्हांला जर कांहीं कामच नसेल तर खिडकीजवळ येऊन बसा. मी एक गोष्ट सांगते तुम्हांला, " आत्या म्हणाली.

"हे बघ आलोच," दोघेंहि एकदम म्हणालें.

"गोष्ट सूर्याची आणि पावसाची आहे," आत्या सुरुवात करीत म्हणाली. "एक काळ असा होता कीं दोघे नेहमीं भांडत असत. आपल्यापैकीं अधिक चांगला कोण आहे आणि कुणाशिवाय जगाचे मुळींच चालणार नाहीं यावद्दल त्यांचा वाद असायचा."फू ऽ" सूर्य म्हणायचा. "माझ्याकडे पहा, मीच सर्वांना जीवन देतो. माझ्याविना कुणी जगूंच शकणार नाहीं. मी ऊव देतो, मी अन्नधान्य पिकवितो, जगाला प्रकाश देतो. मी जर नसतो तर फुलें, झाडे, फळें यांचे काय झाले असते? प्रत्येकजण माझे स्वागत करतो. पण, पावसा, तूं आलास कीं सारा चिखल होतो. लोकांना त्रास होतो, लोकांना तक्रारीशिवाय दुसरें कांहीं सुचतच नाहीं!"

"खरेंच!" पाऊस हळूच बोलायचा. "पण मी नसतो तर तुझाच त्रास अधिक झाला असता लोकांना. पिकें, झाडे, फुलें सुकून नुसते कोळसे झाले असते. खरें म्हणजे माझ्याविना हें जग चाललेच नसते. तुझ्याइतकीच माझीहि आवश्यकता आहे लोकांना. पण मी तुझ्याइतका गर्व करत नाहीं एवढेंच!"

"गर्व!" सूर्य रागाने म्हणाला, "आता या तंटयाचा निकाल लावायला आपण परीक्षाच ठरवूं या. तूं मला तीन महिन्यांचा अवधि दे. मला काय करता येते तें मी दाखवतो. मग पुढच्या तीन महिन्यांत तूं काय तें वरे-वाईट कर. बघूं या जगाला कोण अधिक आवडते तें!"

आणि मग ती कसोटी ठरली. पावसाने सूर्याच्या प्रयोगाच्या कालावधीत एकहि थेंव पाणी न पाडण्याचे आश्वासन दिलें. सुरुवातीला सारेजण म्हणायचे, 'काय सुंदर हवा आहे, नाहीं?' पण कांहीं दिवसांनी त्यांची भाषा बदलली. 'आता पाऊस पडला तर वरें होईल! वाग वाळली अगदी!' असें शब्द येऊं लागलें.पण अजून सूर्य तापतच होता. आणि मग लोक त्याला शिव्या देऊं लागले. फुलें सुकली, गवत पिवळे पडले, झरें आटले. नदीतील पाणी कमी झालें. शेतकरी आपल्या पिकांकडे दुःखाने पाहूं लागले. सूर्य तापतच होता. खेडयांत दुष्काळ पडला. मुलें उपाशी-पोटीं वाळली. रोगराई सुरूं झाली. माणसें आजारी पडली. 'आता मात्र पाऊस पडलाच पाहिजे. नाहींतर सारे उपाशी मरणार' असें लोक म्हणूं लागलें.

मग सूर्याचे डोळे उघडले. आपल्यामुळच ही अवस्था ओढवली आहे हें त्याला कळलें. पाऊस शांतपणे सारे कांहीं पाहत होता. मग मात्र सूर्य त्याच्याकडे जाऊन म्हणाला, 'बाबारे, आता तूंच कांहींतरी करून बघ!' स्मित करून पाऊस पुढें सरसावला आणि त्याने जमिनीवर ताज्या पाण्याची बरसात केली. लोकांना आनंद झाला. पिकें पुन्हां बहरून आली. रोगराई दूर झाली. फुलें फुलली, गवत पुन्हां हिरवेगार दिसूं लागलें. झरें पुन्हां वाहूं लागलें.

"छान!" सूर्य म्हणाला, "मीच चुकलो होतो म्हणायचे तर. तुझीच जगाला अधिक आवश्यकता आहे!"

"छे, छे! तूं पुन्हां चुकतो आहेस बघ," पाऊस शांतपणे म्हणाला. "जगाला आपणा दोघांची आवश्यकता आहे. तुझ्या उष्णतेशिवाय मी कांहीच करूं शकत नाहीं, आणि माझ्या शीतल वर्षावावाचून काय होते हें तूं पाहिलेच आहेस आता यापुढें तरी आपण आपला वाद विसरून जाऊन मित्र म्हणून राहूं या!"



''मला माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर योग्य मुलगा मिळाला,'' श्री शहा म्हणाले.

# सर्वोत्तम शिफारस

श्री. शहा आपल्या घराचे कुंपण ठीक करीत होते. त्यांच्यामागे निगा राखलेल्या हिरवळीचें छोटेसें मैदान होतें. आणि मध्यावर त्यांचे घर होते. सुंदर, मजबूत आणि आधुनिक बांधकामाचें होते तें. त्यासाठीं लाख रुपये तरी खर्च झाले असावेत.

अव्यवस्थित कपडे असलेला, कुंपण नीट करणारा तो माणूसच त्या घराचा मालक होता हें कळल्यानंतर कुणीही त्याला, "कंजूष, कवडीचुंबक" वगैरे म्हणायला कमी केले नसते.

पण ते तसे नव्हतें. ते आपले कुंपण हौशीने नीट करीत होते. त्यांना असल्या कामाची फार आवड होती. त्यांचे हे कपडे असल्या कामाच्या वेळीच ते वापरीत असत. इतर वेळीं ते जें कपडे घालीत तें व्यवस्थित आणि किंमती असत.

ते कंजूष नव्हतें, उलट खर्चिकच होते. ते खूप दानधर्म करीत, गरजू लोकांना मदतही करीत. कधीं कधीं तर मदत मागितली नसतांही ते आपण होऊन गरीबांना मदत करीत.

कुंपणाच्या पलीकडेच रस्ता होता. रस्त्यावर दोन मुलें उभी होती. अगदीं ते काम करीत होते तिथेंच. कुंपणाच्या एका बाजूला शहा होते नि दुसऱ्या बाजूला ती मुलें होती.

"काय जॉर्ज, तुझी खेळायची रॅकेट मात्र भलतीच छान आहे हं! तूं तीस रुपयांपर्यंत विकत घेतली असशील ती, नाहीं?" त्यातील एक दुसऱ्याला म्हणाला.

"फक्त पंचवीस रुपयांत, मोहन," दुसऱ्यानें उत्तर दिलें.

"तुझी जुनी रॅकेटहि अजून चांगली आहे. तूं ती केवढ्याला विकणार आहेस?"

"मी ती कुमारला साडेसात रुपयांना विकली आहे," जॉर्ज म्हणाला.

"हा नुसता मूर्खपणा आहे," मोहन म्हणाला. "मी तिच्यासाठीं साडेबारा रुपये दिले असते."

"क्षमस्व. मी कुमारला तसा शब्द दिला आहे !" जॉर्ज उत्तरला.

"फक्त शब्दच दिलास ना ? आणि त्यानेही पैसे द्यायचे फक्त कबूलच केले असेल, होय ना ? मी तुला साडेबारा रुपये आताच देतो!"

"मोहन, मी तसें करूं शकणार नाहीं."

"तुला हवे असल्यास करूं शकशील. पांच रुपये म्हणजे कांहींच नाहीं कां?"

"तसें नाहीं रे," जॉर्जने कबूल केलें. "पण मी कुमारला शब्द दिला आहे ना!",

"शब्द पाळलाच पाहिजे असें कुणी सांगितलें? तूं त्याबद्दल अधिक पैसे घेऊं शकतोस. त्याला सांग कीं मला पाच रुपये अधिक मिळालेत म्हणून मी ती विकली!" मोहनने सूचविलें.

"नको, मोहन" दुसरा उत्तरला. "तेवढ्याने समाधान होणार नाहीं, कुमारचे नाहीं आणि माझेही नाहीं. मी त्याला निराश करणार नाहीं. व्यवहार तो व्यवहार. रॅकेट दिली नसली तरी ती त्याचीच झाली आहे."

"जाऊं दे. त्याची तर त्याची," मोहन फणकाऱ्याने म्हणाला. "जॉर्ज, तुला फायद्याचा व्यवहार करणें कधीं जमणार नाहीं असे माझे भाकीत आहे. तूं बारीक सारीक गोष्टींकडे भलतेच लक्ष पुरवितोस."

श्री. शहा संपूर्ण संभाषण लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांनी कुंपणांतून बाहेर डोकावलें. आपल्या शब्दाला इतकी किंमत देणारा तो मुलगा त्यांना एकदां पाहायचा होता.

"चांगला दिसतोय. त्याला शब्दाची किंमत कळते. आणि तो बारीकसारीक गोष्टी पाहतो म्हणूनच तो व्यवहारांत यशस्वी होईल," त्यांनी मनांतल्या मनांत म्हटलें.

दुसऱ्या दिवशीं श्री. शहा पुन्हां बागकाम करीत असतांना त्यांना दुसरा एक संवाद ऐकायला मिळाला. यावेळीं देखील कालचा जॉर्ज होताच.

"जॉर्ज, आपण सर्कस पाहायला जाऊं या कां दुपारीं?" तो दुसरा मुलगा म्हणाला,

"नाहीं, असिफ. मी येणार नाहीं," जॉर्ज म्हणाला.

"कां?"

"नको. मी तिथें गेलो तर माझ्या आईला तें आवडणार नाहीं," जॉर्ज म्हणाला.

"तूं जाऊं नये असे ती म्हणाली कां?"

"नाहीं, असिफ."

"मग आपण जाऊं या. तूं कांही तिचा शब्द मोडत नाहींस," असिफ म्हणाला.

"पण तो तिच्या इच्छेचा अनादर होईल, नाहीं कां? मी नाहीं येणार," जॉर्जने आपला निर्णय सांगितला.

"हा आणखी एक चांगला गुण आहे त्या मुलांत!" श्री. शहांनी विचार केला. "जो मुलगा आपल्या आईच्या इच्छेविरुद्ध जात नाहीं तो सहसा चुकणार नाहीं."

दोन महिन्यांनंतर श्री. शहांनी आपल्या फॅक्टरींतील कामासाठीं एक कारकून हवा म्हणून जाहिरात दिली. बारा पंधराजण हजर झाले.

"आज तुम्हीं आपापली नांवे आणि पत्ते द्या. मी चौकशी करीन आणि मग तुमच्यापैकीं एकाची निवड करीन," श्री. शहांनी खुलासा केला.

तीन मुलांनी आपलें नांव आणि पत्ता सांगितला.

"तुझे नांव काय?" त्यांनी चवथ्या मुलाकडे न पहाताच प्रश्न केला.

"पी. के. जॉर्ज!" उत्तर आलें.

श्री. शहांना एकदम तें संवाद आठवले. त्यांनी लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहिलें आणि त्यांच्या चेहऱ्यावर हंसू उमटलें.

"तूं थांब हं," ते म्हणाले. "मला माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर योग्य मुलगा मिळाला." आणि हातानेच त्यांनी इतर साऱ्या मुलांना जायला सांगितलें.

"तुम्हीं माझीच निवड कां केली?" जॉर्ज आश्चर्याने म्हणाला. "माझ्यावद्दल चौकशी करायची गरज वाटली नाहीं तुम्हांला! तुम्हीं मला तर ओळखतसुद्धां नाहीं!"

"मी तुला ओळखतो. तुला तें ठाऊक नाहीं," शहा हंसलें.

"पण मी कुणाची शिफारस आणली नाहीं," जॉर्ज म्हणाला.

"त्याची आवश्यकता नाहीं. तूं स्वतःचीच शिफारस केली आहेस," आणि श्री. शहांनी त्याला सारे कांहीं सांगितलें.

मुलांनो, ही खरी गोष्ट आहे. आणि त्यांत अर्थहि आहे. तुम्हांला कल्पनाहि नसते अशा वेळीं कुणीतरी तुमच्याकडे पाहात असते आणि तुमचे शब्द ऐकत असते. अशा वेळीं तुमच्या स्वभावाची खरी पारख होतें.

● ●

# कॅप्टन दंताळेची पलटण

"आजोबा! आजी!" निर्मला खुशींत हांका मारीत जेवणाच्या खोलींत बसलेल्या आजोबा आणि आजीकडे गेली.

"काय ग, आज लवकर उठलीस?" आजोबा म्हणाले.

"आज तिच्या भावाला तिला जिकायचें नव्हतें कां?" आजी म्हणाली. "तिच्याआधी उठायचें म्हणत होता तो."

दामोदरनें तें बोलणें ऐकले. आपण चटकन त्याच्याकड गेले पाहिजे हें त्यानें ठरविलें.पटकन उठून तो मोरींत पळाला. आजीसमोर जायचे म्हणजे नखें, हात आणि चेहरा अगदीं स्वच्छ पाहिजे हें त्याला माहीत होतें. तेव्हां वेळ वाचविणें हें त्याच्या दांत घासण्याच्या कसरतीवरच अवलंबून होतें.

शीलाआत्या मोरीपुढून गेल्या तेव्हां त्यांनी दामोदरला घाईघाईनें आपल्या समोरच्या दातांवर भराभर ब्रश फिरवितांना पाहिलें. कारण तें जर स्वच्छ केले नाहीं तर चटकन कळून येण्यासारखे होते! त्यानें कपडे बदलले आणि धावत जेवणाच्या खोलींत येऊन सर्वांनाच त्याच्या नीटनेटकेपणामुळें चकित केले.



तेव्हांपासून दामोदर आपलें दांत स्वच्छ ठेवण्याची
काळजी घेऊं लागला.

त्याच दिवशीं शीलाआत्याने त्यांना झाडाखाली बसलेलें पाहिलें. दुपारी सबंध फळबागेंत फिरल्यामुळें ते कांहींसे थकलेले दिसत होते. आत्या त्यांच्याकडे गेल्या तेव्हां त्यांच्या हातांत सरबताचें पेले होते. तें पाहून मुलांना खूप आनंद झाला.

"छान आत्या, आम्हांला काय आवडते हें तुम्हांला नेमकें ठाऊक असते हं!" निर्मला म्हणाली.

"हो ना," आत्या म्हणाल्या. "आणि तुमच्यासाठीं काय चांगले आहे हेंसुद्धां मला ठाऊक आहे!" आत्याच्या डोळ्यांत मिस्किलता दिसली.

"आत्या, आमच्यासोबत बसाना, आणि एखादी गोष्टहि सांगा!" दामोदर म्हणाला.

शीलाआत्याने थोडा वेळ विचार केला अन मग त्या म्हणाल्या, "सांगते हं. ही गोष्ट तुम्हीं पूर्वी कधींच ऐकलेली नाहीं.

"ही गोष्ट एका हुषार कॅप्टनविषयीं आहे, त्याचे नांव दंताळें," आत्याने सुरुवात केली. "तो एका पलटणीचा कॅप्टन होता. पलटणीच्या सैनिकांचा गणवेश अगदीं सारखा होता, एकदम पांढराशुभ्र; आणि कॅप्टन दंताळेला लक्ष ठेवावें लागत असे कीं त्याच्या पलटणींत कुणी गलिच्छ नसावे म्हणून!

"एके दिवशीं कॅप्टनला निरोप आला कीं जनरल वैद्य सर्व पलटणीची खास पहाणी करणार असून सगळ्यांत स्वच्छ असलेल्या पलटणीला खास पारितोषिक देणार आहेत. नंतर कांहीं दिवस त्याने खूप श्रम केले. आपल्या सैनिकांच्या रांगा पाहतांना तो खूष होई. त्याला वाटे बक्षीस आपल्यालाच मिळणार हें निश्चित.

"शेवटीं तो दिवस उगवला. कॅप्टन दंताळेंने आपली पलटण पाहणीसाठीं उभी केली. जनरल वैद्य पलटणीला पाहून खूष झाल्याचें दिसत होते. पण जेव्हां तें फिरत फिरत मागच्या बाजूला गेले तेव्हां ते तिथें मिनिटभर थांबले. कॅप्टन दंताळेला ते मिनिट वर्षासारखे वाटले. कांही घोटाळा तर नाहीं ना?"

"कॅप्टन दंताळे?"

"काय जनरल वैद्य?"

"तुझ्या पलटणीतल्या शेवटच्या दोन सैनिकांच्या कपडयांवर डाग आहेत. याचे कारण सांगता येईल कां?"

कॅप्टन दंताळेने कांहींच उत्तर दिले नाहीं. कारण त्याला माहित होते कीं शेवटीं शेवटीं केलेल्या तयारीत त्याने त्यांच्याकडे फारसें लक्ष दिलेलेच नव्हतें. त्याचे लक्ष फक्त समोरच्या सैनिकांकडेच असे.

"या दोघांचा गणवेश आधीं साफ करवून घे," जनरल वैद्य म्हणाले. "जर ते इतरांप्रमाणे साफ झाले नाहींत तर मला वाटते पुढच्या तपासणीच्या वेळी त्यांना त्यांच्या जागेवरून कमी करण्यांत येईल."

मग कॅप्टन दताळे निराश होऊन घरीं परत आला. त्याच्या पलटणीला बक्षिस मिळालेच नाहीं. त्याने निश्चय केला कीं पुढच्या वेळी हें बक्षीस आपण मिळविलेच पाहिजे. कारण आपल्या पलटणीतून कुणाला कमी करण्यांत येऊं नये असे त्याला वाटत होते आणि आपल्या पलटणीचा त्याला फार अभिमान होता.

शीलाआत्याची गोष्ट संपते न संपते तोंच निर्मला उत्साहाच्या भरांत म्हणाली, "आत्या मला माहीत आहे कॅप्टन दंताळेची पलटण! कॅप्टन दंताळेची पलटण म्हणजे त्याचे दांत!"

शीलाआत्या मोठ्याने हंसून म्हणाली, "अगदी बरोबर! आणि मला वाटते कॅप्टन दंताळे तेव्हांपासून आपले दांत नेहमीं स्वच्छ ठेवण्याची काळजी घेऊं लागला असणार."

"आत्या, गोष्ट छान होती हं! दामोदर, तुला आवडली कीं नाहीं?" निर्मलाने विचारलें.

"हो, छान होती." पण तो अधिक कांहीं बोलला नाहीं. कारण सकाळीं घाईघाईने दांत घाशीत असतांना आपणांस आत्याने पाहिल्याचे त्याला आठवलें. गोष्ट कुणाला उद्देशून सांगण्यांत आली हें त्याला कळलें. रात्री जेवणानंतर मात्र दामोदरला आपली पलटण लक्षपूर्वक साफ करतांना पाहून शीलाआत्याला समाधान वाटलें.

• • •

# लवकर निजे, लवकर उठे, तया—

"आता आपण काय करावें बरं?" वासंतीने प्रश्न केला आणि आपल्या सगळ्या मैत्रिणींकडे पाहिलें.

"मला मात्र घरीं गेलें पाहिजे. बराच उशीर झालाय," उषाने विनंतीवजा आवाजांत म्हटलें.

"घरीं?" वासंती आश्चर्याने उद्गारली. "कशासाठीं?"

उषा अस्वस्थ होऊन म्हणाली, "मला बराच अभ्यास करायचा आहे. पुढल्या आठवड्यांत परिक्षा आहे ना! शिवाय मला जेवायचें आहे आणि लवकर झोपायचे आहे."

"अं, परीक्षा!" वासंती मोठ्याने हसली. आपला खांदा उडवीत ती म्हणाली, "मला त्याची फिकीर नाही. पुढल्या आठवड्यांत मला तीन वाढदिवसांच्या मेजवान्यांना जायचे आहे. आणि त्यांत परीक्षेपेक्षां खचितच अधिक गंमत असते. आणि हो, तूं लवकर म्हणजे केव्हां झोपतेस?"

"आई मला साडेआठ वाजता झोपायला सांगते. ती म्हणते लहान मुलांनी अधिक झोप घेणें अतिशय आवश्यक असते," उषाने स्पष्टीकरण दिलें.

"साडेआठ वाजता! बापरे, नलिनी, तूं ऐकलेस ना?" वासंती म्हणाली. "मी तर हवी तेव्हां झोपायला जाते. असे लहान बाळांसारखे लवकर झोपण्याने काय मिळतें कुणास ठाऊक!"

घरीं परत आल्यावर, त्या संध्याकाळीं उषाला अभ्यास करणे कठीण जात होते. पण ती नेटाने अभ्यास करीत बसली. जेवणाची वेळ झाली तेव्हां ती जेवली. भिंतीवरल्या घड्याळाने साडेआठचा ठोका दिला तेव्हां उषा उठली आणि तिने पुस्तकें आवरून ठेवलीं. अन् मग ती वर आपल्या खोलींत झोपायला गेली.

उषाची आई तिच्या खोलींत आली. तिला उषाचा चेहरा उदासीन दिसला.

"काय झालें तें मला सांगणार नाहींस कां?" तिने खिडकीचे पडदे सारीत हळूंच विचारलें. ते हवेंमुळे सारखे हलत होते. जणू वासंतीच्या उपरोधिक शब्दांची तें आठवण करून देत होते.

"उषा!" तिचे म्हणणें शांतपणे ऐकून घेतल्यावर तिची आई प्रेमाने म्हणाली, "झोपेमुळें पडणारा फरक लक्षांत येण्यासाठीं तूं आरशांतच पाहायला हवें. उद्यां वासंतीकडे जरा लक्षपूर्वक पाहा. ती तुला सदा मलूल, निस्तेज दिसेल. तिच्या डोळ्यांखाली काळी वर्तुळें दिसतील. कारण ती उशीरा झोपते. मग तूं तुझ्या गुलाबी गालांकडे बघ जरा! निराश होऊं नकोस. तूं वर्गात पहिली आलीस तर मला नवल वाटणार नाहीं. वासंती हुशार असेल पण तिची प्रकृती कांही ठीक नाहीं."

मग उषाने साडेआठ वाजता झोपायचे आणि परिक्षेसाठी मन लावून अभ्यास करण्याचे आनंदाने मान्य केले, आणि ती शांत मनाने झोपीं गेली.

वासंती सहसा वर्गांत पहिली असे. एक दोनदां उषा थोड्या गुणांनीच मागे राहिली होती. पण ती वासंतीला मागे टाकील असें कुणाला वाटत नव्हतें.

लववर निजे, लवकर उठे, तया—

झोपल्या झोपल्या उषा स्वप्न पाहत होती. तिच्या मैत्रिणी आणि ती घड्याळावरील अंक झाल्या होत्या. वासंती अकराच्या जागीं होती. आणि उषा आठ झाली होती. अकरा तिला सारखी चिडवीत होती, "असे लहान बाळासारखे साडेआठला झोपण्याने काय मिळते कुणास ठाऊक?" आणि तिला आठ शांतपणे उत्तर देत होती—"लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, आरोग्य, संपत्ती भेटे!" आणि त्यावर अकरा मोठ्याने हसली होती. इतक्या मोठ्याने कीं उषा दचकून झोपेंतून उठली आणि खरोखरच त्यावेळीं घड्याळाचे ठोके पडत होते आणि तिची आई झोपायची तयारी करीत होती.

अशा रीतीने दिवस गेले. वासंती मेजवान्यांना जात होती आणि हवें तेव्हां झोपत होती. इकडे उषा नियमित अभ्यास करीत होती आणि साडेआठ वाजता झोपत होती.

जेव्हा परिक्षेचा निकाल लागला तेव्हां सर्वात अधिक आश्चर्य वासंतीला वाटले कारण तिचा नंबर चार क्रमांकांनी खाली घसरला होता. त्याउलट उषा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती.

● ● ●



आज्ञाभंगामुळें जखम होऊन तिच्यांत पूंही भरला होता आणि मीनाला तापही भरला होता.

# आज्ञाभंगाचा परिणाम

"अरे देवा !" मीना उद्गारली. "पाऊस सुरूं झाला म्हणजे आज घरांतच बसावें लागणार !"

"कांहीं हरकत नाहीं," पद्माने तिला समजाविण्याचा प्रयत्न करीत म्हटलें. "घरांतसुद्धां खेळण्याजोगे कितीतरी खेळ आहेत."

"पण तें जुने खेळ खेळण्याचा मला कंटाळा आलाय. कांहींतरी नवीन करायला पाहिजे!" मीनाने उत्तर दिलें. पण लगेच तिचा चेहरा उजळला. "आपण असे करूं या. कागद कापून त्यांची छानपैकी नक्षी तयार करूं या. आईने नवीन कात्री आणली आहे. तिला त्यासंबंधी कांहीं कळणारसुद्धां नाहीं. चल पद्मा!"

पण पद्माला आनंद झालेला दिसत नव्हता. तिला ठाऊक होते कीं मीनाला होकार देणे चूक होते. आणि तिने जर नकार दिला तर मीनाने तिला चिडविलें असते.

"आपण दुसरा कांहींतरी खेळ खेळू या!" तिने सांगून पाहिलें. "तुझ्या आईला जरी कात्रीबद्दल कांहीं कळलें नाहीं तरी तुला तिच्या इच्छेविरुद्ध करण्यांत फारसा आनंद होणार नाहीं. आणि आईची आज्ञा मोडणें योग्यहि होणार नाहीं."

"पद्मा, आता गप्प राहा. शिकवूं नकोस मला," मीना अधीर होऊन म्हणाली. "मला त्यांत कांहींच वाटत नाहीं."

तिने पद्माचा हात धरला आणि तिला ओढतच आंत नेले. मग ती चकाकणारी नवी कात्री घेऊन आली. कागदाचे निकामी तुकडे शोधण्यात आले आणि मग नक्षी कापायला सुरुवात झाली. पद्मा मात्र गप्पपणें सारे कांहीं पाहत होती.

एकाएकी दोघींच्या तोंडून भीतियुक्त उद्गार बाहेर पडलें. मीनाच्या मधल्या बोटांतून रक्त वाहूं लागले होते. बोटाला वेदना होत होत्या तरी मीना आई काय म्हणेल याचाच विचार करीत होती. तिने लगेच रक्ताने माखलेले कपडे बदलले. कात्री जागेवर नेऊन ठेवली आणि आई जेव्हां आंत आली तेव्हां आईला मुळींच संशय येणार नाहीं इतक्या निर्विकारपणे ती आईला सामोरी गेली. तिची युक्ति सफल झाली. आईला कसलाहि संशय आला नव्हता. मीनाने आपले दुखावलेले बोट कुणाच्याहि दृष्टीस पडूं दिले नाहीं.

सबंध संध्याकाळ आणि रात्रभर तिच्या बोटाला वेदना होत होत्या. तिला झोपसुद्धां लागली नाहीं. सकाळीं शाळेची तयारी देखील मोठ्या त्रासाने पार पडली. आणि शेवटीं दुखावलेले बोट न बांधता ती तशीच शाळेंत गेली.

मीनाचा सबंध दिवस त्रासांत गेला. तिला इतका त्रास कधींच झाला नव्हता. तिच्या शिक्षकांनी केलेल्या कानउखाडणीचेहि तिला कांहींच वाटलें नाहीं. तिला फक्त एकच कळत होते आणि तें म्हणजे तिचे दुखावलेले मधलें बोट! त्याच्या वेदनांपुढे तिला दुसरें कांहीं सुचत नव्हतें.

संध्याकाळीं तिला उदास आणि आजारी पाहून आईला आश्चर्यच वाटलें. तिला लगेच गादीवर झोपवून तिने डॉक्टरला बोलाविलें. मग त्यांच्या तपासणीत सारे कांही कळलें. मीनाच्या त्या लहानशा जखमेंत पू भरला होता व त्यामुळें तिला तापही भरला होता.

बरेच दिवस मीनाला आईची आज्ञा मोडल्याबद्दल झालेली, तिनें आपण होऊन घेतलेली शिक्षा भोगावी लागली.

ती चांगली बरी झाल्यानंतरहि तिच्या आईने तिला त्याबद्दल काहीं विचारलें नाही. कारण तिला ठाऊक होतें कीं मीनाला तिच्या गैरवर्तणुकीबद्दल पुरेशी शिक्षा झालेली आहे. आणि तें खरेंहि होते. मीना आपल्या वेदना आणि दु:ख इतकें लवकर विसरूं शकणार नव्हती,– आणि त्याचे कारणसुद्धां !

✣ ✣ ✣

१६३५८
बा. बा



चांगले आरोग्य काळजीपूर्वक कमवावे लागते.

# नशीब कीं प्रयत्न?

"कांहीं लोक फारच नशिबवान असतात," एके दिवशीं जेवतांना विनायक आपल्या आईला म्हणाला. "सुधाकरने यावर्षी पुन्हां शरीर-सौष्ठवाचे बक्षिस मिळवलें."

आईने त्याच्याकडे पाहिलें.

"तें कांहीं नशीबामुळें नाहीं, विनू ! तो आता पूर्वीपेक्षा अधिक मेहनत, व्यायाम वगैरे, करीत असणार," आई म्हणाली.

"छे, तसें कांहीं नाहीं," विनायक म्हणाला. "मला माहीत आहे कीं तो आमच्यापेक्षा जास्त व्यायाम करीत नाहीं नि आमच्यासोबतच तो खेळत असतो. त्याचे नशीब बलवत्तर आहे, कारण दोन वर्षांपूर्वी तो सर्वांत शेवटीं होता.

असे म्हणून विनायक समोरच्या जेवणावर तुटून पडला.

"तूं जर इतक्या झपाट्याने जेवला नाहीस," आई त्याला अडवित म्हणाली, –"तर कदाचित तूं सुद्धां तें बक्षिस मिळविशील."

विनायक मोठ्याने हसला आणि म्हणाला, "याचा नि त्याचा कांहीं संबंध नाहीं. मी सांगतो ना, तें केवळ नशीबावरच अवलंबून आहे."

असें म्हणून त्याने बाकीचे जेवण गटागट गिळलें. कारण शाळेंत जातांना रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला असणाऱ्या मिठाईच्या दुकानांत त्याला जायचे होते.

रस्त्यांत त्याला सुधाकर भेटला.

"ए सुधाकर," तो ओरडून म्हणाला. "कमाल आहे तुझी! यावर्षी तूं पुन्हां बक्षीस मिळविलेस ना!"

"पण त्याहून विशेष म्हणजे बाबांनी मला दहा रुपये दिलेत आणि हवे तें विकत घ्यायला सांगितलें," सुधाकर अभिमानाने म्हणाला.

"खरेंच?" विनायक उद्गारला. "मग तुला दुकानांतल्या लिमलेटच्या सर्व गोळ्या, जिलबी, लाडू विकत घेता येतील, नाहीं?"

सुधाकरने नकारात्मक मान हलवली.

"नाहीं. मी असल्या गोष्टी खाणें कधींच सोडून दिले आहे," तो म्हणाला.

"पण तुला तर त्या खूप आवडायच्या ."

"होय," सुधाकर म्हणाला. "मी पूर्वी त्या खूप खात असे. म्हणून मला भूकच लागत नसे. आणि नेहमी आळस येत असे.मला वर्गांत लक्ष देणें किंवा अभ्यास करणेंहि कठीण जात असे. वरचेवर मला पित्ताचा, अपचनाचा, दातांचा त्रास होत असे. तेव्हां डॉक्टरांनी मला हे पदार्थ खायला मनाई केली, आणि ताजे दूध, फळें आणि भाज्या खायला सांगितलें."

"आणि तूं तसे केलेस?"

"होय, मी तसे केलें. कांहीं दिवसांतच मला उत्साह वाटूं लागला. माझा आळस गेला.माझी बुद्धी अधिक तल्लख झाली.वर्गात शिकविलेले पाठ मला कळूं लागले. अभ्यास सोपा वाटूं लागला. माझी प्रकृति कल्पनेपलिकडे सुधारली." विनायक विचारांत पडला.

"तूं बक्षिस त्यामुळेच मिळविलेस कीं काय?" तो म्हणाला. सुधाकरने होकार दिला.

"आणि मी जर मिठाई खाण्याऐवजी फळें, भाज्या खाऊं लागलो तर मी पण तुझ्यासारखा सुदृढ होईन?" विनायकने विचारलें.

"निःसंशय!" सुधाकर म्हणाला. "चांगले आरोग्य काळजीपूर्वक कमवावें लागतें."

"खरें आहे," विनायक म्हणाला. "मला वाटलें होतें कीं तें नशीबावरच अवलंबून असते. आता मीहि जोभेवर ताबा ठेवून सुदृढ व्हायचा प्रयत्न करीन!"

卐 卐 卐

# आपुलकीचे प्रतिफळ

"मोहन? ए मोहन? टेलीफोन!" आईने हांक मारून सांगितलें.

मोहन सावकाश झोक्यावरून उतरला. क्षणभर व्हरांड्यांत कठड्याला रेलून उभा राहिला. मग घरांत गेला.

"सारखे मोहन! मोहन! चालतेय यांचे. मी आतां नांवच बदलून टाकतो माझें म्हणजे मला सांगता येईल कीं मोहन घरांत नाहीं. आतां कुणाचा फोन होता? आणि त्यांना काय हवें होते?"

"रानडेबाईंनी फोन केला नि तुला साबणाची वडी आणायला सांगितली. त्या विसरल्यात आणायला, आणि जातांना टपाल ऑफिसांत त्यांची कांहीं पत्रें असतील तर तीही घेऊन ये."

"एवढ्यां उन्हांत जायचे? नुसत्या साबणासाठीं! त्याची फारशी आवश्यकताहि नसेल! त्यांना हवे असलेल्या वस्तु आणायची आठवण कां राहत नाहीं? मी काय त्यांचा नोकर आहे? मला आज माझी वर्तमानपत्रें घेऊन साऱ्या गांवभर पायपीट करायची आहेच."

तरी आपली टोपी घालून मोहन बाहेर पडला. पोस्ट ऑफिस एका टोकाला होते आणि वाण्याची दुकानें दुसऱ्या टोकाला होती.

तो जाऊन बराच वेळ झाला. पश्चिमेला ढग जमूं लागले होते आणि मोहनचे पेपर बाहेरच रस्त्याच्या कडेला पडले होते, मोटारींतून टाकले गेले होते तसेच.



मोहन नेहमीं आपुलकीनें सर्वांना मदत करीत असे.

आणि मग मोहन आला. थकून भागून आल्यामुळें त्याचा चेहरा लालबुंद दिसत होता.

"किती उशीर झाला! बऱ्याच जणांना मदत करून आलास की काय?', आईने प्रेमाने विचारलें.

"मला तर वाटतें आज साऱ्यांनाच मदतीची गरज होती. मी साबण विकत घेतला. पोस्ट ऑफिसांत गेलो तर पोस्टमास्तर म्हणाले कीं, दीक्षित बाईंचे एक मोठें पार्सल आलेले आहे नि त्यांनी सांगितले आहे कीं मी तें त्यांच्या घरीं आणून देईन. झाले, मी पार्सल उचलून घेतलें. केवढें वजनदार होते ते! चर्चपर्यंत गेल्यावर आठवलें कीं रानडेबाईंची पत्रें घ्यायची राहिली. त्यांची पेटी जवळ जवळ भरलेलीच होती. मला वाटतें त्या आठवडाभर तिकडे फिरकल्या नसाव्यात. मी परत जाऊन ती पत्रें घेतली. मग दीक्षितबाईंचे तें पार्सल घेऊन मी त्यांच्या घरीं गेलो. त्या तें उघडून पाहण्यांत इतक्या गुंतल्या होत्या कीं आभार मानायलासुद्धां विसरून गेल्या. उलट त्यांच्या लहान पुतणीला पिण्यासाठीं शरबत तयार करायला मला सांगितलें!

"आणि सर्वांवर कळस म्हणजे, मी परत येत असतांना चव्हाणबाई त्यांच्या कोंबड्यांना पकडण्यासाठीं त्यांच्यामागे धावत होत्या आणि मला पाहताच साहजिकच त्यांनी 'मोहन! मोहन!' करून मला हांक मारली. त्या कोंबड्या पकडता पकडता नाकीनऊ आलें. पण आता त्या साऱ्या कोंबड्या खुराड्यांत आहेत. बरें तर– आता मी पेपर वाटून येतो."

मोहनची आई आपल्या शिवणकामाकडे वळली.

"काम असलें कीं साऱ्यांना नेमकी मोहनची आठवण यावी हें ठरलेलेंच," त्या मनाशीं म्हणाल्या. "दुसऱ्यांना मदत करणें चांगले आहे, यांत शंकाच नाहीं. पण लोकांनीही जरा विचार करायला नको कां?"

तो कडक उन्हाळा संपला. शरद ऋतु गोंवराची साथ घेऊन आला. मोहन मात्र घरोघर पेपर वाटतांना निर्भिक मनाने आपल्या आजारी मित्रांशी गप्पा करीत असे.

"मला गोंवराची भीति वाटत नाहीं. कारण मी लहान होतो तेव्हांच तो मला होऊन गेला," तो सांगायचा.

पण एके दिवशीं तो घरीं आला तेव्हां त्याचे डोळे लाल दिसत होते. चेहरा तापला होता आणि डोके भयंकर दुखत होते. आणि मग तो बरेच दिवस आजारी होता.

"गोंवरच आहे हं, मोहन, फक्त तो तुला दुसऱ्यांदा भेटतोय!" डॉक्टर गंमतीने म्हणाले. "त्यांत फारसें नवल नाहीं, अनेकांना गोवर दोनदां तिनदांसुद्धां होतो. मला तर चारदां झाला होता." अन मग सारे हसले.

एके दिवशीं सकाळीं आईने त्याच्यासाठीं संत्र्याचे सरबत आणले. त्यापेक्षा अधिक चविष्ट कांहीं असते हें मोहनला सांगूनही पटले नसते इतकें तें त्याला आवडलें.

"आपण इथें आल्यापासून तूं खूप मित्र मिळविलेस, होय ना, मोहन?" हंसत त्याची आई म्हणाली. "हें शरबत रानडेबाईंनी पाठविले आहे. आणि तूं झोपला होतास तेव्हां दीक्षितबाईंनी हा लाल गुलाबांचा गुच्छ आणला."

"मला हीं फुलें खूप आवडतात हें त्यांना ठाऊक आहे," मोहन हंसून म्हणाला.

जेव्हां तो हिंडू फिरूं लागला तेव्हां एके दिवशीं डॉक्टर जोशी त्याला समुद्रकिनारीं फिरायला घेऊन गेले. त्याचा आनंद गगनांत मावेना. त्याला बऱ्याच भेटीसुद्धां आल्या होत्या. "आई, हे बघ, दोन रुमाल, हें एक चित्राचे पुस्तक, हा खेळ आणि टॉर्च, शिवाय दहा रुपये! माझ्या पेपराच्या ग्राहकां-कडून या भेटी आल्यात म्हटलं! आई, इथली माणसं चांगली आहेत हं. मला वाटायचे सारे स्वार्थी आहेत. कामासाठीं मात्र त्यांना मी हवा आहे. पण—मी चुकलो होतो तर!"

"बाळ, तूं त्यांची कामें आपुलकीने करीत होतास म्हणून त्यांनाही तुझ्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. आपण प्रेम दिलें म्हणजे आपल्यालाही प्रेम निश्चित मिळतें," आई विचारपूर्वक उत्तरली.

卐 卐 卐

# 'आळशी' हाड

"गोपाळ, मला वाटतें मी माझा चश्मा वरच विसरलो." साऱ्या खोलीभर शोध केल्यावर आजोबा म्हणाले.

"पण आजोबा . ." गोपाळ म्हणाला. खरें म्हणजे वरखालीं येजा करणें मोठ्या कटकटीचे आहे असें त्याला वाटायचे. पण स्वतःचे कांहीं काम असलें, आणि दुसरे कुणी जवळ नसले तर मग गोष्ट वेगळी! पण त्याची ती कुरकुर सुरू होण्यापूर्वीच लहानगी सुमन आपले शिवणकाम सोडून उठली आणि "मी आणून देते हं आजोबा!" म्हणून वर पळाली.

"गोपाळ, तूं तुझे सामान जाग्यावर ठेवलें नाहींस!" थोड्या वेळाने आई म्हणाली.

"पण आई..सारे जागच्या जाग्यावर आत्ताच कशाला ठेवायचे? तें उद्यापर्यंत तिथेंच राहिले तर चालणार नाहीं कां? मला तें उद्या परत लागेल!" गोपाळ कुरकुरला.

"आत्तांच्या आत्ता तें उचलून ठेव पाहूं," आई निश्चयाने म्हणाली आणि गोपाळने मुकाटयाने आपले सामान जाग्यावर ठेवलें.

"काय करावें– हा एवढा अभ्यास माझ्याने कधीं होणार नाहीं!" त्या दिवशीं संध्याकाळीं शाळेचा अभ्यास करतांना गोपाळ म्हणाला. "किती अभ्यास करायचा माणसाने ? "

डॉ. भागवत त्यावेळी आजोबांशी गप्पा मारत बसले होते. आळशी गोपाळचे शब्द त्यांनी ऐकलें. ते त्याच्याकडे पाहून म्हणाले,

"गोपाळ, मी आज काय केले असावें असें तुला वाटतें ?"

"काय केलें, डॉक्टर ?" गोपाळ आनंदाने म्हणाला. तेवढीच अभ्यास बंद करण्याची मिळालेली संधी पाहून तो आनंदला होता.

"एका मुलीचा हात तोडला!"

"तुम्हीं जोडला असे तुम्हांला म्हणायचे आहे ना!" गोपाळने विचारलें.

"नाहीं. मी हात तोडला," डॉक्टर म्हणालें. "कांही दिवसांपूर्वी तिचा हात मोडला होता आणि त्यावेळी तो चुकीच्या पद्धतीने बसविण्यांत आला. त्यामुळें तिला फार त्रास होत होता. एकच मार्ग उरला होता, तो म्हणजे तिचा हात पुन्हां तोडायचा आणि नव्याने बसवायचा !

"गोपाळ, मला वाटते तुझ्यांतदेखील असें एक हाड आहे कीं तें लवकरांत लवकर मोडलें पाहिजे.– अर्थात तुला अधिक चपळ व्हायचे असेल तर ! मी बरेंच दिवसांपासून तुला हें सांगू इच्छित होतो."

गोपाळचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला.

"कोणतें तें हाड?" त्याने थरथरत्या आवाजात विचारलें, "तुम्ही खरेंच कां तें मोडणार आहांत ?"

"नाहीं. मी तें तोडूं शकणार नाहीं," डॉक्टरांनी उत्तर दिलें. "तूं स्वतःच तें मोडलें पाहिजे. त्याला फार तर 'आळशी हाड' म्हणता येईल !"

"म्हणजे, तुमच्या म्हणण्याचा अर्थ मी आळस सोडला पाहिजे असा आहे तर !" गोपाळने हंसण्याचा प्रयत्न करीत म्हटलें. त्याच्या मनावरचे दडपण दूर झाले होते.

"होय. मला तेंच म्हणायचे होते. आणि हें हाड तूं मोडायलाच हवें. तरच तुला आयुष्यांत कांहीं करता येईल. त्यासाठीं बऱ्याच प्रयत्नांची आवश्यकता आहे. कारण तें सर्वांत कठीण असें हाड आहे. पण प्रयत्न केलास तर तूं तें मोडू शकशील. काय, करणार ना मग प्रयत्न ?"

"होय डॉक्टर, नक्कीच," गोपाळ विश्वासपूर्वक म्हणाला. आपल्याला लोकांनी आळशी म्हणावें या विचारानें तो लज्जित झाला होता.

● ● ●

# मालतीची रोजनिशी

सणाचा सारा उत्साह, सारी गंमत ओसरली होती. घरीं हंसतमुखानें येऊन नाताळच्या शुभेच्छा व्यक्त करणारे काका आणि काकू आता येईनासे झाले होते. आणि त्यांच्याबरोबरच रंगीबेरंगी रिबन बांधलेले मिठाईचे डबेपण यायचे थांबले होते. म्हणूनच जेव्हां न्याहारी करतांना मालतीने आपल्या टेबलावर रंगीत कागदामध्यें गुंडाळलेले एक लहानसे पुडकें पाहिलें तेव्हां तिला जरा आश्चर्यच वाटलें.

"यांत काय असावें बरें?" ती स्वत:शीच पुटपुटली.

"उघडूनचां बघ ना," आई म्हणाली.

मालतीने रिबन सोडली. आणि तिच्या नजरेस काय पडलें ठाऊक आहे? एक चौकोनी पुस्तक !

मालतीचा चेहरा एकदम पडला. "अं ऽ ऽ" तिने निराशेने उसासा टाकला. "हें तर नुसते पुस्तक आहे, सुनिलकाकाकडून आलेले."

तिच्या सगळ्याच काकांनी आणि काकूंनी यावर्षी तिला अशीं पुस्तकें दिली होती. आणि सार्‍यांनाच वाटत होते कीं आपण तिला कांहींतरी 'नवीन' उपयुक्त वस्तु दिली म्हणून!

मालतीने पहिलें पान उलटलें. "ही आरोग्य रोजनिशी आहे," तिने वाचले. त्याखालीं खालील कविता होती :

"चांगल्या आरोग्याचा वाटत असेल हेवा
तर वाचा आणि ही रोजनिशी ठेवा.
मग कांहीं दिवसांनंतर अहा !
एक अमोल खजिना मिळतो पहा !"

मालतीचे डोळे आश्चर्याने मोठे झाले. "काय असणार बरें तो खजिना ?" ती विचार करू लागली. तिने रोजनिशीची पुढलीं पानें चाळण्याचा प्रयत्न केला पण सर्व चिकटपट्टीने एकत्र चिकटविलेली होती.

पहिल्याच पानावर अगदी तळाशी तिला एक लहानशी सूचना लिहिलेली आढळली: "वरील आरोग्याचे नियम पाळल्यानंतर तुम्ही पट्टी तोडून पुढच्या पानाकडे वळूं शकता."

मालतीची उत्सुकता इतकी वाढली होती कीं तिने सर्व नियम तावडतोब अंमलांत आणलें. ती लवकर झोपूं लागली. लवकर उठूं लागली. जेवतांना पोट भरगच्च होईपर्यंत खाण्याचे टाळूं लागली. नियमित व्यायाम करूं लागली. आणि जसजसा एकेक नियम ती आचरणांत आणूं लागली तसतसे तिने रोजनिशीतील नियमांवर खूण करून ठेवायला सुरुवात केली.

दहा दिवस असे गेल्यावर सारेजण तिच्या आरोग्याची तारीफ करूं लागले. ती सुंदर आणि बळकट दिसूं लागली.

अकराव्या दिवशीं मालतीने शेवटची पट्टी तोडली आणि आंतले पान उघडले. त्यावर लिहिलेले होते:

प्रिय मालती,

या पानापर्यंत येईपर्यंत जर तूं या रोजनिशीच्या सूचना विश्वासूपणें पाळल्या असतील तर तुला आरोग्याचा खजिना लाभलाच असणार. पारितोषिक म्हणून तुझ्यासाठी मी एक सुंदर सायकल घेतलेलो आहे. मला कळीव कीं मी ती घेऊन येईन.

तुझे काका,
सुनिल

मालतीने आनंदाने उडी मारली. "अस्सें आहे तर! हाच सुनिलकाकांचा खजिना. किती मजेदार! "

आपल्या दुचाकी खजिन्यावर मालती बेहद्द खूष होती. ती अजूनहि त्या रोजनिशीतले सारे नियम पाळीत होती.ती एक शहाणी मुलगी होती.आणि तिला ठाऊक होते कीं चांगले आरोग्य हे तिच्या सायकलइतकेच किंबहुना अधिक महत्त्वाचे होते.



''माझ्याइतका उत्कृष्ट फुटबॉल कुणी खेळू शकत नाहीं,' बढाईखोर दिनू म्हणत असे.

# बढाईखोर दिनू

दिनू भलताच बढाईखोर होता. तो नेहमीच बढाया मारायचा कुणी कांहींहि सांगो, त्याचें एकच प्रत्युत्तर असावयाचें, "हुं ऽऽ त्यांत काय मोठेसें ! कुणीहि करील तें !"

एके दिवशीं सायंकाळीं सारेजण व्हरांड्यांत बसले होते. बाबा वाचत होते. आजी आणि आई शिवणकाम करीत होत्या. दिनूची बहीण लता आणि लहान भाऊ राजू आपापला अभ्यास करीत होते. त्याच वेळीं दिनू डुलत डुलत आंत आला आणि एका खुर्चीत बसून अलीबाबा आणि चाळीस चोर वाचूं लागला.

तेवढ्यात राजू त्याच्याकडे जाऊन म्हणाला, "भाऊ, मी काढलेले चित्र पहा. मी आजच शाळेंत काढलें, छान आहे कीं नाहीं ?"

"हुं ऽऽ! आहे साधारण ! मी शाळेंत असतांना काढलेलें चित्र तूं बघायला हवें होतें. यापेक्षां कितीतरी चांगलें होतें तें !" बढाईखोर दिनू म्हणाला.

राजू निराश झाला. पण त्यानें कांही उत्तर दिलें नाहीं, तेव्हां लता उठून त्याच्याजवळ जात म्हणाली, "राजू, मला पाहूं दे रे तुझें चित्र. किती छान काढलें आहेस! मलासुद्धां तुझ्यासारखें काढता यायला पाहिजे नाहीं कां ?" राजू खिन्न झालेला पाहून तिला वाईट वाटलें होतें.

त्यानंतर दिनू कांहीं कामाकरता आंत घरांत गेला. तो जेव्हां बाहेर आला तेव्हां सारे जसेच्या तसेच होते. बाबा अजून वाचतच होते. आजी आणि आई शिवत होत्या, लता आपलीं पुस्तकें वाचतच होती आणि राजू चित्र काढण्याचा प्रयत्न करीतच होता.

"शेवटीं हें शिवण संपलें एकदाचें!" आजी म्हणाली आणि तिनें आपले हातातलें शिवण गुंडाळून ठेवलें.

"हुं ऽऽऽ" आई म्हणाली. "तुझें एक व्हायच्या आंत मी दोन शिवून पूर्ण केलेत कीं !"

साऱ्यांनी आईकडे कुतुहलानें पाहिलें. कारण ती अशा रीतीनें कधीं आजीला बोलेल असें कुणालाच वाटलें नव्हतें.

आजीनें दुसरें कापड काढलें आणि एक शब्दहि न बोलता तिने शिवणकाम सुरू केलें.

"माझी प्रश्नपत्रिका बघा," लता म्हणाली. "मी सारीं गणितें सोडविलीत, एकहि चूक न करता"-ती वडिलांजवळ गेली आणि तिनें आपलीं गणितें त्यांच्या हातांत दिलीं.

"हुं ऽऽऽ! हें तर कांहींच नाहीं," बाबा म्हणाले. "मी शाळेंत होतो तेव्हां मी सोडविलेलीं उदाहरणें तूं पाहायला हवीं होतीस."

बिचारी लता रडकुंडीला येऊन तें शब्द ऐकत होती. नेहमीं प्रेमानें बोलणारे बाबा आज असें कां बोलतात हें तिला कळेना. जेव्हां बाबांनी तिला जवळ घेऊन तिच्या कानांत कांहींतरी सांगितलें तेव्हां तिच्या चेहऱ्यावर पुन्हां हसूं आलें.

"माझीं फुलें बघ किती सुंदर दिसताहेत. लवकरच तीं फुलतील!" आई म्हणाली.

"हूं ऽऽऽ! तुला तसें वाटतें," आतां आजी तिला अडवून म्हणाली. "तूं कामत कुटुंबाचीं फुलें पहायला हवी होतीस. तीं महिनाभर फुललेलीं होतीं आणि तरीहि कळ्यांनी भरलेलीं होतीं."

साऱ्यांना काय झालें दिनूला कळेना ! ते सारे असे तुसड्यासारखे कां वागत होते ?

जेव्हां वडील म्हणाले कीं त्यांनीं त्या दिवशी वजन केलें तें एकशेचौपन्न पौंड झालें आणि ते त्यांच्या दृष्टीनें योग्यच होतें, तेव्हा आई म्हणाली, "हूंऽऽ! तुम्हीं त्याला योग्यच म्हणणार ! मिस्टर मोहिलेंनी त्या दिवशीं वजन केलें! दोनशेपंचवीस पौंड! आणि तरीहि त्यांना कोणी बढाई मारतांना पाहिलें आहे कां ?"

सारेजण मोठ्यानें हंसले आणि आजी तर व्हरांड्यांतून आंत पळाली. कारण हंसता हंसता तिची पुरेवाट झाली होती.

दिनूनें सारे आपल्याला हंसतात हें ओळखलें.

"बाबा, तुम्हीं मला कां हंसत आहांत?"

"नेमकें तुला नाहीं. पण सारे तुझ्यासारखी बढाई मारूं लागले तर कसें काय वाटेल हें आम्हांला पहावयाचें होतें."

त्यापुढें दिनूनें कधीं बढाई मारली नाहीं.

• • •

# उर्मिलेचा पाठ

एकदा उर्मिला नांवाची एक लहान मुलगी होती. ती तोंड न धुताच सर्वत्र फिरायची. खेळत असतांना आईने तिला तोंड धुवायला बोलावलें तर ती तोंड वेंगाडून नाहीं म्हणायची.

एके दिवशीं तिच्या आईनें तिला संगीताचा पाठ शिकण्यासाठीं बोलाविलें.

"मला नाहीं संगीत शिकणें आवडत! आणि मला रोज रोज तोंड धुणें आणि केस विंचरणेंसुद्धां आवडत नाहीं. मी जर रानांतले रानटी जनावर असते तर बरें झाले असते! मग मला हवे तितके गलिच्छ राहता आले असते," उर्मिला म्हणाली.



आपल्या मुलीला स्वच्छता आणि संयम कसे शिकवायचे याचे तिच्या आईला कोडें पडलें. तितक्यांत कुठल्यातरी गंमतीदार कल्पनेने उर्मिलेचा चेहरा उजळला.

ती म्हणाली, "आई, मी जर रोज माझे तोंड स्वच्छ धुवायचे व केस विंचरायचे वचन तुला दिलें तर येत्या उन्हाळ्यांत आपण गांवीं गेलो म्हणजे मला हवें तसे तूं वागूं देशील?"

आई हंसली व म्हणाली, "तुला कसें वागायला हवें त्यावर तें अवलंबून राहील. काय हवंय् तुला?"

"हें बघ आई, आपण गांवीं जाऊ ना, तेव्हां सबंध आठवडाभर तोंड न धुता व केस न विंचरता मला राहूं दिले पाहिजेस."

आई एक क्षणभर कांहींच बोलली नाहीं. मग मात्र ती निश्चयपूर्वक म्हणाली, "ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे तूं कर."

पुढचे दोन आठवडे कसल्याही तक्रारी नव्हत्या.

पुढे ती आपल्या आईबरोबर गांवाला गेली. जेव्हां आई स्वयंपाक करूं लागली तेव्हां उर्मिला झाडाखालीं खेळत होती. जेवण होताच आईने तिला हांक मारली. उर्मिला नाचतच आंत आली आणि टेबलाजवळ बसली. जशी होती तशीच. म्हणजे हात मळलेले आणि केस पिंजारलेले.

जेवणानंतर उर्मिला तिच्या दोन कुत्र्यांबरोबर खेळली. जेव्हां रात्रीच्या पडद्याआडून आकाशांतले तारे डोकावूं लागले तेव्हां ती झोपी गेली. ती फार थकली होती. पण तिने आपले तोंड मात्र धुतले नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर न्याहारीची वेळ होईपर्यंत ती झाडाखाली खेळत होती. न्याहारीलाही ती तशीच तोंड न धुता बसली.

दहा वाजता पाऊस पडूं लागला. पाऊस थांबल्यावर उर्मिलाने आपले बूट व मोजे काढून टाकलें आणि ती जवळच्या डबक्याच्या पाण्यांत शिरली. तिच्या चेहऱ्यावर आणि कपड्यांवर चिखल उडाला, पण त्याची तिला पर्वा नव्हती.

शेवटी उर्मिला चिखलांत खेळून खेळून थकली आणि आता ओटयाच्या कडेवर पाय सोडून बसली. तेवढयांत तिच्या एका कुत्र्याने तिच्याजवळ उडी मारली. तो आपल्या पायाला लागलेला चिखल चावूं लागला. जणूं त्याला अस्वच्छ राहायला आवडत नव्हतें. मग उर्मिलेचे लक्ष खुर्चीवर बसलेल्या तिच्या दुसऱ्या कुत्र्याकडे गेले. तो आपल्या पंजाने हळूवारपणे आपला चेहरा स्वच्छ करीत होता. तेवढयांत दोन चिमण्या पावसाच्या साठलेल्या पाण्याकडे उडत आल्या आणि चिवचिवाट करीत पाणी उडवूं लागल्या, पाण्यांत आंघोळ करूं लागल्या.

उर्मिला पाय हलवित विचार करूं लागली. पक्षी आणि जनावरेंसुद्धां स्वत:ला स्वच्छ ठेवतात हें पाहून तिला आश्चर्य वाटलें. तिने आपले हातपाय पाहिलें. बापरे! काय पण दिसत होती ती! सर्वांगावर चिखल उडालेला होता. ती उठून न्हाणीघरांत धावत गेली. मग तिने आपले गाल गुलाबी सफरचंदासारखे दिसेपर्यंत घासून स्वच्छ केले. केस न् केस स्वच्छ होण्याइतके तिने डोके विंचरले.

अर्ध्या तासानंतर आईने उर्मिलाला दुपारच्या जेवणासाठी बोलाविलें. तेव्हां ती दिवाणखान्यांत आली. आई थक्क होऊन हंसली. उर्मिला अगदी स्वच्छ नि टवटवीत होती. तिने स्वच्छ रेशमी कपडे घातले होते. तिच्या पायातील बूट आणि मोजेही स्वच्छ होते. केस विंचरलेले होते. हा चमत्कार कसा घडला म्हणून आईने तिला विचारलें नाहीं. तरीहि उर्मिला म्हणाली, "घाणेरडे असण्यांत मजा नाहीं हेंच खरें!"

✣ ✣ ✣

म. ग्रं. सं. ...
दा. क्र. ९६४०८
वि. बा. बा

# समाप्तीची प्रार्थना

श्रीख्रिस्ता, करुणाकरा, अघहरा, विश्वंभरा, मंगला ।
त्वत्सेवा करण्यास ज्ञान बल दे, हे प्रार्थितो प्रेमला ॥

जावो नांव दिगंतरी तव, गुरो, होवो तुझे गौरव ।
व्हावे लीन तुझ्या पदीं, प्रभुवरा, हें आमुचे वैभव ॥

—स. आ. पाठक

Owned by the Oriental Watchman Publishing House, Salisbury Park, Poona.
Published and printed by V. Raju at and for the Oriental Watchman Publishing
House, Salisbury Park, Poona 411001.—2041-73.